१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• पुणे, रविवार १० ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२४, पाने-८, किंमत : ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 324, Marathi - Daily - Pune, 10 August, 2025 Page- 8 Price- Rs. 7/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना चांदीची राखी



**आळंदी -** रक्षाबंधनाच्या निमित्ताने वारकरी भक्तांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींना चांदीची राखी अर्पण केली. वाघोली येथील गाडे कुटुंबियांनी माऊलींना अर्ध्या किलोपेक्षा अधिक वजनाची ही खास राखी अर्पण केली आहे. गाडे कुटुंबीय सलग तीन वर्षे सोन्याची राखी अर्पण करत होते. यावर्षी माऊलींच्या स्वर्णकलशासाठी सोने दान करून, त्यांनी अर्ध्या किलोपेक्षा जास्त वजनाची चांदीची राखी अर्पण केली. रक्षाबंधन साजरे करताना गाडे कुटुंबियांनी खरीप हंगामात राज्यातील शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळावे, तसेच त्यांचे सुख, शांती आणि समृद्धीने जीवन भरून जावे, अशी प्रार्थना ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणी केली.

# कबुतरांना दाणे घालणाऱ्यांचा माजोरीपणा वाढला

## गाड्यांच्या टपांवर कबुतरांचे खाद्याचे ट्रे

**मुंबईतील कबुतरखाने बंद करण्यावरून मोठा वादंग माजला असताना आज काही तथाकथित पक्षीप्रेमींनी आपल्या मुजोरीचे चीड आणणारे वर्तन केले. स्वतः ला कबुतरांचे तारणहार समजणाऱ्या या लोकांनी न्यायालय व मुंबई महानगरपालिकेच्या आदेशाची खिल्ली उडवत स्वतःच्या गाड्यांच्या टपांवर पत्र्याचे ट्रे ठेवून त्यावर कबुतरांना दाणे देण्यास सुरुवात केली. अशा दहा पंधरा गाड्या दादरच्या कबुतरखाना परिसरात फिरत होत्या. दादर परिसरातीलच काही इमारतींच्या गच्चीवर काही लोकांनी कबुतरांना दाणे टाकून पालिकेला खिजवण्याचा प्रयत्न केला. एकाने तर गिरगाव चौपाटीवर दहा पोती धान्य कबुतरांसाठी ओतून त्याचा व्हिडिओ शेअर केला. पोलिसांनी चौकशी करून सायंकाळी कारवर ट्रे ठेवून कबुतरांना दाणे देणाऱ्या महेंद्र संकलेचा नावाच्या इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आणि त्याची गाडी जप्त केली.**



■ मुंबई

**दादरच्या** भवानी शंकर रोडवर गोल देऊळ जवळ स्वतःच्या चारचाकीच्या टपावर पत्र्याच्या ट्रेमधून कबुतरांना दाणे देत फिरत असलेल्या एका अमराठी माणसाला एका मराठी माणसाने हटकले. तुम्ही राहता कुठे असे त्याला मराठी माणसाने विचारले असता त्याने आपण लालबाग, चिवडा गल्लीतील मॅग्नम टॉवर या इमारतीत राहतो, असे रुबाबात सांगितले. त्याला त्याचे नाव विचारले असता आपले नाव संकलेचा आहे, असेही त्याने तोऱ्यात सांगितले. तुम्ही कबुतरांना दाणे देण्यासाठी इथे का आलात, तुमच्या इमारतीजवळच कबुतरांना दाणे का देत नाही, असा सवाल विचारला असता त्याचे उत्तर न देता आमच्या आणखी दहा बारा गाड्या लवकरच इथे येणार आहेत, सर्वत्र कबुतरांसाठी फिरणार आहेत असे तो मराठी माणसाला खिजवण्याच्या सुरात म्हणाला. त्याने भगव्या » पान २ वर

# १५ ऑगस्टला ट्रम्प-पुतीन भेट

## करार झाला तर भारताला दिलासा?

**भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून भारताला एकूण ५० टक्के आयात कर लावणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प १५ ऑगस्ट रोजी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेणार आहेत. रशिया-युक्रेन युद्ध थांबवण्याच्या दृष्टीने ही भेट होत असून, या भेटीत रशिया आणि अमेरिका यांच्यात करार होणार आहे. हा करार झाला तर त्याचा फायदा भारताला होऊ शकतो. ट्रम्प यांचा रशियाचे तेल घेतल्याचा राग कमी होईल आणि भारतावर या कारणाने लादलेला २५ टक्के अतिरिक्त आयात कर पूर्णपणे हटवली जाण्याची शक्यता आहे.**



■ वॉशिंग्टन

**डोनाल्ड** ट्रम्प यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करून माहिती दिली की, माझी आणि पुतीन यांची बहुप्रतिक्षित बैठक पुढील शुक्रवारी, १५ ऑगस्ट रोजी अमेरिकेतील अलास्का राज्यात होईल. त्याबाबत अधिक तपशील नंतर दिला जाईल. त्यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलतानाही सांगितले की, राष्ट्राध्यक्ष पुतीन यांना शांतता हवी आहे आणि झेलेन्स्की यांनाही आता शांतता हवी आहे. सर्व पक्ष युद्धबंदी कराराच्या जवळ आहेत. या बैठकीमुळे साडेतीन वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष संपुष्टात येऊ शकतो. यात दोन्ही देशांना महत्त्वाचे प्रदेश एकमेकांना सोपवावे लागू शकतात. झेलेन्स्की यांनी काही गोष्टी मान्य करण्याची वेळ आली आहे. मात्र झेलेन्स्की यांनी आज पुन्हा म्हटले की युक्रेनचा एक इंच भूभाग मी देणार नाही. त्यामुळे युध्दबंदी होते का, याबाबत साशंकताच आहे.

ट्रम्प यांनी ही घोषणा केल्यानंतर त्यांच्या पुतीन समवेतच्या भेटीत युक्रेन युद्धासह इतर कोणत्या विषयांवर चर्चा होते याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे. ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून त्यांनी रशिया व युक्रेन यांच्यातील युद्ध थांबवण्याची इच्छा अनेकदा बोलून दाखवली. युद्धबंदीसाठी त्यांनी दोन्ही देशांना आधी ५० व नंतर १० दिवसांचा अवधी दिला होता. या दोन्ही मुदती संपल्या आहेत. मात्र, युद्धबंदीसाठी पुतीन हे ट्रम्प यांच्याशी चर्चा करायला तयार नव्हते. आता ते तयार झाल्याने अमेरिकेच्या भूमीवर दोन नेत्यांची पहिल्यांदाच भेट होणार आहे.

२०१७ ला जर्मनीच्या हॅम्बर्ग येथील जी-२० परिषदेच्या वेळी दोघांची बैठक झाली होती. त्यानंतर व्हिएतनाम आणि » पान २ वर

## पवारांचा १६० जागांचा गौप्यस्फोट दावा हास्यास्पद! विरोधकांची टीका

■ नागपूर



**ज्येष्ठ** नेते शरद पवार यांनी आज ओबीसी यात्रा सुरू करण्यापूर्वी नागपूरमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी शरद पवार यांनी म्हटले की विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन व्यक्तींनी माझी भेट घेतली. २८८ जागांपैकी १६० जागा आम्ही तुम्हाला जिंकून देण्याची खात्री देतो, असे ते म्हणाले. मात्र आम्ही ते मान्य केले नाही. शरद पवार यांनी हा गौप्यस्फोट केला. पण त्या दोन माणसांची नावे व पत्ताही माहीत नाही असे त्यांनी सांगितले. त्यामुळे हा अत्यंत हास्यास्पद गौप्यस्फोट आहे, अशी टीका सत्ताधाऱ्यांनी केली.

शरद पवार म्हणाले की, राहुल गांधींनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर सखोल विचार करण्याची गरज आहे. संसदीय लोकशाही पद्धतीवर लोकांमध्ये शंका निर्माण होणे योग्य नाही. याची योग्य चौकशी झाली पाहिजे. आम्हाला निवडणूक आयोगाकडून उत्तर पाहिजे. यासाठी सोमवारी संसदेतील सर्व सहकाऱ्यांचा मोर्चा निवडणूक आयोगावर निघणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी तेव्हा दिल्लीत मला दोनजण भेटायला आले होते. त्यांची नावे व पत्ते आत्ता माझ्याकडे नाहीत. ते म्हणाले होते की, महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ जागांपैकी १६० जागा जिंकून देण्याची गॅरंटी आम्ही » पान २ वर

## उबाठा नेत्याच्या मुलावर शिंदे सेनेचा आरोप

■ मुंबई


**वरळी** कोळीवाड्यात नारळी पौर्णिमेच्या कार्यक्रमावेळी काल उबाठा आमदार आदित्य ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील कार्यकर्त्यांमध्ये जोरदार घोषणाबाजी झाली. त्यानंतर या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या गोंधळादरम्यान शिंदे गटाच्या महिला शाखाप्रमुखाने उबाठा आमदार सुनील शिंदे यांचे पुत्र आणि युवासेनेचे पदाधिकारी सिद्धार्थ शिंदे यांनी » पान २ वर

## राज्यात धान्य दारूच्या अटी जाहीर! सर्वसामान्यांची भाकरी महागणार

■ मुंबई

**महायुती** सरकारने राज्यात केवळ धान्यापासून मद्यनिर्मिती केली जाईल, अशा मद्याला महाराष्ट्रनिर्मित मद्य असा परवाना दिला जाईल, असे ठरवित त्यासाठीच्या अटी व शर्ती आज जाहीर केल्या. या प्रोत्साहनानंतर धान्यापासून होणाऱ्या मद्याची निर्मिती वाढेल. याचा थेट परिणाम गरिबांच्या ताटातील भाकरीवर होणार आहे. कारण मद्यासाठी आणखी धान्य गेले तर आताच १०० ते १२० किलो असलेली ज्वारी, बाजरी आणखी महाग होईल.

राज्यात बनवल्या आणि विकल्या जाणाऱ्या या धान्यापासून बनविण्यात येणाऱ्या मद्याच्या निर्मिती प्रकल्पांसाठीच्या अटी व शर्तींचा तपशील सरकारने नुकताच जाहीर केला आहे. मात्र, धान्य-आधारित मद्यनिर्मितीमुळे धान्याचे भाव वाढून सर्वसामान्यांच्या ताटातील भाकरी महागणार आहे. » पान २ वर




## ॲमेझॉन, वॉलमार्टने भारतातील ऑर्डर रोखल्या! प्रचंड नुकसान

■ न्यूयॉर्क

**अमेरिकेचे** राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून येणाऱ्या वस्तूंवर आयात शुल्क दुप्पट करून ५० टक्के केले आहे. या निर्णयानंतर ॲमेझॉन, वॉलमार्ट आणि टार्गेटसारख्या अमेरिकन रिटेल कंपन्यांनी भारतातून येणाऱ्या नवीन ऑर्डर थांबवल्या आहेत. त्यामुळे भारतीय निर्यातदारांना अंदाजे ३५ ते ४३ हजार कोटींचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून जाणाऱ्या वस्तूंवरील आयात कर दुप्पट करून थेट ५० टक्क्यांवर नेला आहे. या निर्णयाचा फटका भारतीय वस्त्रोद्योगाला बसू लागला आहे. ॲमेझॉन, वॉलमार्ट, टार्गेट आणि गॅपसारख्या अमेरिकेतील मोठ्या रिटेल कंपन्यांनी भारतातून » पान २ वर

## संदीपान भुमरेंच्या चालकाच्या जमिनीचा बाजारभाव २,००० कोटी

■ छत्रपती संभाजीनगर




**शिंदे** गटाचे खासदार संदिपान भुमरे आणि त्यांचा मुलगा आमदार विलास भुमरे यांचा चालक जावेद शेख यांनी हिबानामा केलेल्या जमिनीमुळे वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. या जमिनीची शासकीय भाव २४१ कोटी ६९ लाख ५१ हजार ४०८ रुपये आहे. परंतु या जमिनीचा बाजारभाव तब्बल २,००० कोटी इतका आहे.

हैदराबादमधील सालारजंग कुटुंबातील वंशजाने ही जमीन संदीपान भुमरे यांच्या चालकाच्या नावाने भेट म्हणून दिली, असा दावा केला जात आहे. या प्रकरणात भुमरेंच्या चालकाला आयकर विभागाची नोटीसदेखील पाठवण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरच्या आर्थिक गुन्हे शाखेने महसूल विभागाला या जमिनीचे शासकीय मूल्यांकन काढण्यासाठी पत्र लिहिले होते. त्यानंतर महसूल विभागाने या जमिनीची अधिकृत किंमत काढली. त्यानुसार, हॉटेल अमरप्रीत ते शहानूर मिया दर्गाकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ ३६,१९० चौ. मी जमिनीचा भाव ९३ कोटी ३१ लाख ४४ हजार ६७४ रुपये आहे. सिंधी कॉलनी, मित्रनगर परिसरातील २७,९७० चौ. मी जमिनीचा भाव ७२ कोटी ११ लाख ९५ हजार २६२ रुपये आहे. पन्नालाल नगर, श्रीनगर भागातील २५१४० चौ. मी. जमिनीचा दर ३६ कोटी ४२ लाख १० हजार ७२२ रुपये आहे. तर उर्वरित » पान २ वर

## कुलगाममधील चकमकीत दहशतवादी ठार! २ जवान शहीद

■ कुलगाम

**जम्मू-काश्मीरमधील** कुलगाम जिल्ह्यातील अखल जंगल परिसरात सुरू असलेल्या चकमकीत



सुरक्षा दलांनी आणखी एका दहशतवाद्याचा खात्मा केला. या कारवाईत लान्स नाईक प्रितपाल सिंग आणि शिपाई हरमिंदर सिंग हे दोन जवान शहीद झाले. याशिवाय चार सैनिक जखमी झाले.

ऑपरेशन अखल असे नाव असलेली ही संयुक्त कारवाई जम्मू-काश्मीर पोलिसांचा स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप, भारतीय लष्कर आणि केंद्रीय राखीव पोलीस दल यांनी १ ऑगस्टपासून राबवली आहे. आज या मोहिमेचा नववा दिवस होता. आज सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार झाला. यामध्ये चार सैनिक जखमी झाले. जंगलात अजूनही काही दहशतवादी लपल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आतापर्यंत या कारवाईत तीन दहशतवादी ठार झाले आहेत. २ ऑगस्ट रोजी सकाळी दोन दहशतवादी ठार झाले होते. त्यापैकी एकाची ओळख पुलवामातील हरिस नजीर दार अशी झाली असून तो सी-श्रेणीतील दहशतवादी होता.





# भारत झुकेगा नहीं...

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आकारलेल्या नवीन टॅरिफच्या मुळाशी दबावतंत्र असल्याचे दिसते. या निर्णयामुळे अमेरिकेला भारताकडून होणाऱ्या निर्यातीत घट झाली तरी भारताच्या अर्थव्यवस्थेवर काही परिणाम होणार नाही. कारण भारतीय अर्थव्यवस्था ही निर्याताधारित अर्थव्यवस्था नाही. त्यामुळेच पंतप्रधान मोदी यांनी अमेरिकन दबावशाहीपुढे न झुकण्याची रणनीती स्वीकारली आहे. आज जर आपण झुकलो तर भविष्यात आणखी दबाव येऊ शकतो आणि वारंवार नतमस्तक व्हावे लागू शकते, हे यामागचे मुख्य कारण आहे. हे लक्षात घेऊनच जनहिताच्या दृष्टीने आजवर भारताने अमेरिकेसोबत अंतरिम व्यापार करार केलेला नाही.**



>> रविवार विशेष

● डॉ. जयंतीलाल भंडारी
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारत व अमेरिकेतील व्यापार आणि गाढ मैत्री ज्या चमकदार उंचीवर पोहोचेल, अशी जी अपेक्षा होती, ती १ ऑगस्ट रोजी ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याची घोषणा केल्यानंतर आणि ६ ऑगस्ट रोजी रशियाकडून तेलखरेदीचे कारण पुढे करत अतिरिक्त २५ टक्के दंडात्मक शुल्क आकारणी जाहीर केल्यामुळे धुळीस मिळाल्याचे दिसत आहे. इतकेच नाही, तर ट्रम्प यांनी दुर्दैवी पद्धतीने भारतीय अर्थव्यवस्थेला मृतप्राय ठरवत भारतीय अर्थव्यवस्था त्यांचा जुना मित्र असणाऱ्या रशियाप्रमाणे गर्तेत जाईल असेही म्हटले आहे. विशेष म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह ७० देशांवर व्यापार असंतुलन दूर करण्यासाठी टॅरिफ लावले असून यामध्ये भारतावर ५० टक्के टॅरिफ निश्चित केले आहे.

ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रूथ सोशलवर एका पोस्टमध्ये म्हटले की, भारत आपला मित्र आहे, पण गेल्या अनेक वर्षांत आपण त्यांच्यासोबत तुलनेने कमी व्यापार केला आहे. कारण तेथे खूप मोठ्या प्रमाणावर आयात शुल्क आकारले जात असून याबाबत भारत जगात अव्वल स्थानी आहे. भारतात अन्य देशांच्या तुलनेत सर्वात कठोर व्यापार अडथळे आहेत. भारताने नेहमी आपली लष्करी साधनसामग्री आणि कच्चे तेल याचा मोठा हिस्सा रशियाकडूनच खरेदी केला आहे. आज प्रत्येक जण रशिया युक्रेनमधील हत्याकांड थांबवेल अशी इच्छा बाळगून असताना भारताची ही कृती योग्य नाही!

विशेष म्हणजे अमेरिका आणि भारतामधील अंतरिम व्यापार करारावर अंतिम स्तरावरील चर्चा सुरू असतानाच ट्रम्प यांनी हे आयात शुल्क आकारण्याची घोषणा केली आहे. खरे पाहता फेब्रुवारी २०२५ मध्ये पंतप्रधान मोदी आणि ट्रम्प यांच्या दरम्यान झालेल्या करारानुसार २०२५ च्या अखेरीस या व्यापारचर्चांना अंतिम स्वरुप द्यायचे ठरले आहे. पण अंतरिम व्यापार करारावर अंतिम चर्चा चालू असतानाच भारत देशातील कोट्यवधी लोकांच्या उपजीविकेशी जोडलेल्या शेती व डेअरी क्षेत्रात सवलत देण्यास तयार नाही, अशा परिस्थितीत भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने हे भरभक्कम टॅरिफ जाहीर केले आहेत. काही देशांनी ट्रम्प यांच्या एकतर्फी व भेदभावपूर्ण मागण्यांपुढे नतमस्तक होत अमेरिकेच्या मागण्या मान्य केल्या आहेत. भरभक्कम टॅरिफला मान्यता दिली आहे आणि अमेरिकेत मोठी गुंतवणूक करण्याचे वचन दिले आहे. पण भारत या देशांप्रमाणे अमेरिकेपुढे झुकण्यास तयार नाहीये. ट्रम्प यांनी ज्या प्रकारे इतर देशांना व्यापार करारासाठी राजी केले, तसा दृष्टिकोन भारताबाबत ठेवणे कठीण आहे. अशा कोणत्याही कराराला मान्यता देणे भारतासाठीही अवघड आहे. कारण भारताच्या विकास आणि उपजीविकेशी संबंधित गरजा वेगळ्या आहेत.

अमेरिका हा भारताचा प्रमुख व्यापारी भागीदार आणि निर्यातीसाठीचे एक गंतव्यस्थान आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताने अमेरिकेला ८६.५ अब्ज डॉलर मूल्याच्या वस्तूंची निर्यात केली, जी याआधीच्या वर्षाच्या तुलनेत ११.६ टक्के अधिक आहे. दुसरीकडे या काळात अमेरिकेकडून होणारी आयात ४५.७ अब्ज डॉलर इतकी झाली. त्यामुळे अमेरिकेसोबत भारताचा व्यापार अधिशेष ४०.८ अब्ज डॉलर राहिला. ही व्यापारतूट कमी करणे हा ट्रम्प यांचा मुख्य उद्देश आहे.

ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफच्या पार्श्वभूमीवर भारतातील अनेक उद्योग-व्यवसाय प्रभावित होतील. विशेषतः ज्या सर्व वस्तू व सेवांची भारत निर्यात करतो, त्या कंपन्यांवर मोठा परिणाम होईल. उदाहरणार्थ, ऑटोक्षेत्रातील सुटे भाग बनवणाऱ्या कंपन्या, वस्त्रोद्योग, धातू आणि औषध कंपन्यांवर ट्रम्प यांच्या टॅरिफचा परिणाम दिसू शकतो. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (जीटीआरआय) ने म्हटले की, भारताची वस्तू निर्यात आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये ८६.५ अब्ज डॉलरवरून ३० टक्क्यांनी घटून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ६०.६ अब्ज डॉलर राहू शकते. त्याचप्रमाणे जागतिक वित्तीय सेवा कंपनी बार्कलेजने म्हटले की, अमेरिकेकडून भारतावर २५ टक्के सीमा शुल्क आणि टॅरिफ लावल्याने चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) च्या वाढ दरात केवळ ०.३० टक्क्यांची घट येऊ शकते.

बार्कलेजने म्हटले आहे की, देशांतर्गत मागणीवर आधारित भारतीय अर्थव्यवस्थेवर या शुल्कवाढीचा व्यापक परिणाम होण्याची शक्यता नाही. भारतीय अर्थव्यवस्थेची तुलनेने बंदिस्त रचना व देशांतर्गत मागणीवरील तिचे अवलंबित्व यामुळे ती मोठ्या धक्क्यांपासून वाचते. यासोबतच बार्कलेजने अपेक्षा व्यक्त केली की, भारत-अमेरिका व्यापार चर्चांनंतर अंतिम शुल्कदर पुढे जाऊन कमी होऊन २५ टक्क्यांपेक्षा कमी होऊ शकतो. ज्या ठिकाणी ट्रम्प यांच्या टॅरिफमुळे भारतातील उद्योग-व्यवसायांवर प्रतिकूल परिणाम होईल, त्या ठिकाणी अमेरिकेलाच भारतापेक्षा अधिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

नवीन टॅरिफमुळे अमेरिकेला भारताकडून होणाऱ्या निर्यातीत घट झाली तरी भारताच्या अर्थव्यवस्थेवर काही परिणाम होणार नाही. कारण भारतीय अर्थव्यवस्था ही निर्याताधारित अर्थव्यवस्था नाही. त्यामुळेच पंतप्रधान मोदी यांनी अमेरिकन दबावशाहीपुढे न झुकण्याची रणनीती स्वीकारली आहे. आज जर आपण झुकलो तर भविष्यात आणखी दबाव येऊ शकतो आणि वारंवार नतमस्तक व्हावे लागू शकते, हे यामागचे मुख्य कारण आहे. हे लक्षात घेऊनच जनहिताच्या दृष्टीने आजवर भारताने अमेरिकेसोबत अंतरिम व्यापार करार केलेला नाही.

> डोनाल्ड ट्रम्प इतर देशांशी भारताचे संबंध ठरवण्यासाठी व्हेटो मागत होते. म्हणजेच भारताने कोणासोबत कसे संबंध ठेवायचे याचे सर्वाधिक ट्रम्प यांना हवे होते. स्वाभाविकपणे भारताने त्यास स्पष्ट नकार दिला. कारण परराष्ट्र धोरणातील स्वायत्तता ही सर्वांत महत्त्वाची आहे.

### काय करायला हवे?

आता भारताला अमेरिकन बाजारपेठेत निर्यात करण्याच्या बाबतीत आव्हानांना सामोरे जावे लागेल. अशा परिस्थितीत भारताने अनेक बाबींवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. भारताने आपल्या अर्थव्यवस्थेला आणखी बहिर्मुख बनवणे आवश्यक आहे. सुदैवाने, अलीकडे भारताने महत्त्वाचे मुक्त व्यापार करार (एफटीए) केले आहेत. आता येणाऱ्या काळात अशा इतर करारांच्या दिशेने दुप्पट वेगाने पुढे जावे लागेल. आग्नेय आशियाच्या आर्थिक क्षेत्राशी पुन्हा जोडले जावे लागेल. आपल्याला पूर्वेकडील शेजाऱ्यांसोबत आर्थिक संबंधांचा मार्ग पुन्हा तयार करावा लागेल. भारताने व्यापक व प्रगतिशील प्रशांत-पार भागीदारी (सीपीटीपी) चा भाग बनण्यासाठी पुढे जावे लागेल. संपूर्ण जगात भारताच्या सेवा निर्यातीला वेगवान गतीने वाढवावे लागेल. भारत आपल्या देशातील कोट्यवधी लोकांच्या शेती व डेअरी क्षेत्राशी संबंधित हितासाठी ठामपणे उभा राहिला आहे, ही बाब लक्षात घेऊन नागरिकांनीही पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत स्थानिक व स्वदेशी उत्पादनांना सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होत असताना भारतातील १४० कोटी लोकांचा विशाल बाजार आणि भारतीय युवकांची वाढती क्रयशक्ती या पार्श्वभूमीवर व्यापारी ट्रम्प भारतासोबत परस्पर व्यापारहितांच्या अंतरिम कराराला अंतिम स्वरूप देण्याच्या वाटेवर पुढे येतील अशी अपेक्षा ठेवूया. ●●●

## अमेरिकेलाच फटका

● अलीकडेच प्रकाशित भारतीय स्टेट बँकेच्या नवीन संशोधन अहवालानुसार, ट्रम्प टॅरिफचा परिणाम भारताच्या तुलनेत अमेरिकन अर्थव्यवस्थेवर खूप अधिक पडण्याची शक्यता आहे.

● एसबीआय रिसर्चने इशारा दिला आहे की, हा निर्णय अमेरिकेत उच्च महागाई, कमकुवत डॉलर आणि सकल देशांतर्गत उत्पादनातील घट याचे कारण बनू शकतो.

● एसबीआय रिसर्चने आपल्या अहवालात म्हटले की, ही अमेरिकेची ही व्यापारनीती अयोग्य आहे. यामुळे अमेरिकेतील देशांतर्गत महागाई व ग्राहकांच्या किंमतींवरच नकारात्मक परिणाम होईल. तसेच जागतिक पुरवठा शृंखलेत लपलेल्या शक्ती स्वतःला समायोजित करून भारताला काहीसा दिलासा देतील.

---

# टेरिफ अस्त्राचे हादरे बसतील?




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कथित टेरिफ बॉम्बमुळे जागतिक व्यापारयुद्ध सुरू होण्याच्या शक्यता दिसत आहेत. भारतावर २५ टक्के आयात शुल्क आकारणी सुरू झाली असून, २७ ऑगस्टपर्यंत रशियाकडून करण्यात येणारी तेलआयात न थांबवल्यास अतिरिक्त २५ टक्के टेरीफ आकारण्याची गर्जना ट्रम्प यांनी केली आहे. वास्तविक, या महम्मद तुघलकी धरसोड धोरणाचा सर्वात मोठा फटका कोणाला बसला असेल तर तो अमेरिकेला. तेथील वाढती महागाई, चलनवाढ, बेकारी ही समस्यांची मालिका म्हणजे एक दुष्टचक्र आहे. तेथील उद्योजक, शिक्षण तज्ज्ञ आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अव्वल दर्जाचे धुरीण ट्रम्प यांच्या धोरणाला कमालीचे वैतागले आहेत. सततच्या धरसोडीमुळे ट्रम्प यांची विश्वासार्हता कमी होत आहे.

परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी ट्रम्प यांच्या आक्षेपांना दिलेले उत्तर रोखठोक आणि तेवढेच सुस्पष्ट आहे. त्यांनी अमेरिकेने केलेले सर्व आरोप नाकारले आहेत आणि भारताने रशियाबरोबर कच्च्या तेलाच्या खरेदीबाबत घेतलेली भूमिका कशी समर्थनीय आहे ते प्रभावी युक्तिवादाच्या आधारे स्पष्ट केले आहे. भारताच्या प्रवक्त्यांनी याची आठवण करून दिली की, भारताच्या भूमिकेचे अमेरिकेने तेव्हा ज्या सक्रियतेने स्वागत केले होते आणि तेल आयातीला प्रोत्साहन दिले होते; पण आता मात्र डोनाल्ड ट्रम्प ताकाला जाऊन भांडे का लपवित आहेत? भारताची कच्च्या तेलाची आयात ही जागतिक बाजारपेठेतील परिस्थितीमुळे भाग पडलेली गरज आहे. पण रशियाच्या तेल खरेदीमुळे ट्रम्प यांच्या नाकाला मिरच्या का लागल्या? याबाबत अमेरिकेने भारतावर टेरिफची सक्ती का करावी? भारताबद्दल आगपाखड करणारी अमेरिका व युरोपीय राष्ट्रे स्वतःचे पोट भरण्यासाठी रशियाबरोबर व्यापार करतात तेव्हा त्यांना नीतीचे धडे का आठवत नाहीत?

> केंद्र सरकार अमेरिकेच्या कारवायांना उत्तर देण्यासाठी शांत आणि विचारपूर्वक पावले टाकत असून या सावध धोरणाचे विविध व्यापार गटांनी स्वागत केले आहे आणि सरकारच्या भूमिका उचलून धरल्या आहेत. खरे तर गेल्या दहा वर्षापासून भारताने मेक इन इंडिया पुढाकार घेतला आहे आणि आपल्या गरजा आपण पूर्ण करत आहोत. आपल्या उपभोगाच्या वस्तू व सेवा आपण निर्माण करत आहोत आणि जगभर त्यांचा लौकिक वाढल्यामुळे त्यांची मागणीही वाढत आहे. अशा वेळी नवनव्या बाजारपेठा काबीज करणे महत्त्वाचे आहे. आपल्या उद्योगपतींशी चर्चा करून 'ठोशास ठोसा' या न्यायाने कडक भूमिका घ्यावी लागेल. आपली निर्यात धोरणे काटेकोरपणे राबवावी लागतील.

युरोपियन युनियनने रशियासोबत आतापर्यंत ६०.५ अब्ज युरो एवढा द्विपक्षीय व्यापार केला आहे. २०२३ मध्ये युरोपियन युनियन आणि रशिया यांच्यातील व्यापार हा १७.३ अब्ज युरो एवढा होता. मागील वर्षाच्या १६.२ दशलक्ष टन यापेक्षाही ही वाढ निश्चितच जास्त होती. स्वतः युरोपियन युनियन रशियाशी सातत्याने चढ्या दरात व्यापार करत आहे. पण भारताच्या व्यापारावरून मात्र का नाके मुरडत आहे? अमेरिकेचे हे धोरण दुटप्पी आहे. अमेरिका रशियाकडूनही त्यांच्या अणू प्रकल्पासाठी युरेनियमची खरेदी करते. तसेच आपल्या स्वार्थासाठी रशियाकडून ईव्ही उद्योगासाठी लागणारी सामग्री तसेच खते रसायने मायनिंग व वाहतूक साधनेही अमेरिका खरेदी करत आहे. युरोपियन युनियन भारतापेक्षाही अधिक तेल रशियाकडून खरेदी करत होता.

रशिया हा भारताचा विश्वासू व्यापारी मित्र आहे. त्यामुळे रशियाच्या तेल व्यवहारामुळे भारतावर ५० टक्के आयात कर लादण्याची धमकी म्हणजे ट्रम्प यांचा मस्तवालपणा होय. खरेतर रशिया विरुद्ध युक्रेनला अमाप शस्त्रे व अफाट पैसा बायडन यांच्या काळात अमेरिकेने युक्रेनला पुरविला, हे ट्रम्प विसरलेले दिसतात. तेलही गेले तूपही गेले अशी त्याची गत झाली आहे. ट्रम्प सत्तेवर येऊन आठ महिने झाले तरी युद्धे काही थांबत नाहीत. निराशेपोटी ट्रम्प जगावर टेरिफचे वार करीत आहेत. त्यांची ही हेकट भूमिका पाहता भारतानी चोख उत्तर दिले असून, याचे परिणाम निश्चितपणाने दिसून येतील.



● प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर
आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे अभ्यासक

राहिला प्रश्न ट्रम्प धोरणांच्या परिणामांचा. पण यामुळे भारताच्या आर्थिक वाटचालीवर काहीही प्रतिकूल परिणाम होणार नाही. कारण भारताची अर्थव्यवस्था सुदृढ आहे, निरोगी आहे. स्वदेशी वस्तूंचा वापर करून, त्यांची मागणी वाढविण्याचे भारतीयांचे तंत्र अजून अमेरिकेला सम जलेले नाही. नवीन सहस्त्रकात २००८, २०१२, २०१९ अशी तीन-चार वेळा मंदी आली आणि गेली. पण त्या मंदीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला नाही. कारण भारतीयांना लागणाऱ्या वस्तू व सेवा निर्माण करण्यात भारतीय उद्योजक कमालीचे खंबीर व मजबूत आहेत.

ऑटो पार्ट्स, कापड उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स या व्यवसायावर अमेरिकेच्या टेरिफ धोरणाचा संभाव्य परिणाम होऊ शकतो; पण भारतीय उद्योजक आता याबाबतीत इतर देशाशी संपर्क साधत आहेत. म्हणजे अमेरिकेने हात टेकले, विरोध केला तर त्यामुळे भारताचे फार मोठे नुकसान होईल असे नाही. उलट अमेरिकेला भारतीय बाजारपेठ गमवावी लागेल. यासाठी भारताला केवळ तात्पुरता विचार करून चालणार नाही तर दीर्घकालीन धोरणे समोर ठेवावे लागतील. असुरक्षित क्षेत्राच्या बाबतीत अत्यंत सावधपणे पावले टाकावी लागतील. कारण त्यामध्ये आपला फायदा आहे. भारताला युरोप, आखाती देश, तसेच आफ्रिकन देश असे कितीतरी पर्याय आहेत, सावधगिरी म्हणून आपणास सतत नव्या पर्यायांचा शोध घेणे आवश्यक आहे.

याबाबतीत तत्काळ काही प्रमुख उपाय योजले पाहिजेत. पहिला म्हणजे आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील ज्या क्षेत्रावर अमेरिकेचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो त्याबाबतीत आपण पर्यायी बाजारपेठा शोधल्या पाहिजेत. त्या मजबूत केल्या पाहिजेत. दुसरा म्हणजे, आपल्या वस्तू व सेवांची गुणवत्ता वाढवून अमेरिकेच्या वस्तूंपेक्षाही आपला दर्जा अधिक उंचावला पाहिजे. शेती क्षेत्रासोबत दुग्ध उत्पादनात भारताने स्वतःची विपणन व्यवस्था विकसित केली आहे आणि या संवेदनशील क्षेत्रात कुठल्याही पाश्चात्य देशाला घुसू देता कामा नये.

अलीकडे बनारस येथे झालेल्या शेतकऱ्यांच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींनी स्वदेशीचा जागर घडविला. स्वदेशी हाच आपल्या प्रगतीचा मंत्र आहे, आत्मनिर्भर भारताचा पाया आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. भारतीयांनी भारतात तयार झालेली भारतीय उत्पादने वापरली पाहिजेत आणि विदेशी वस्तू व सेवांवर बहिष्कार टाकला पाहिजे. हे धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे, लोकमान्य टिळक यांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणार' अशी घोषणा केली होती तेव्हा त्यांनी सांगितलेल्या चतुःसूत्रीमध्ये स्वराज्य, स्वदेशी राष्ट्रीय शिक्षण आणि परकीय वस्तूवरील बहिष्कार हे चार महत्त्वाचे बिंदू सांगितले होते. १०५ वर्षे झाली, पण टिळकांच्या विचारातील तत्वे आजही तेवढीच कायम आहेत आणि अमेरिकेविरुद्धच्या या लढाईमध्ये ती पुन्हा एकदा निर्णायक ठरणारी आहेत.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी आपल्या एकात्म मानवतावाद या सिद्धांतामध्ये सुद्धा स्वदेशीचा विचार मांडला होता. स्वदेशी जागरण मंचनेही आता स्वदेशीची लोकचळवळ पुन्हा एकदा हाती घेतली असून स्वदेशीच्या वापराबाबत प्रत्येक नागरिकाला आग्रह धरला जात आहे. याद्वारे आपण येऊ घातलेल्या कोणत्याही टेरीफ बॉम्बची भक्कमपणे मुकाबला करू शकतो.

ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या तिसऱ्या आठवड्यात अमेरिकेचे शिष्टमंडळ भारतात येणार आहे. त्यांचे डोळे उघडावेत म्हणून भारताने स्पष्ट गणित मांडले आहेत, समीकरणे स्पष्ट केली आहेत. भारत एक महासत्ता आहे लोकशाही प्रजासत्ताक आहे त्यामुळे ट्रम्प यांच्या धमक्यांना भारत भीक घालणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे. ●●●


---



# 'आप'च्या एक्झिटचा अन्वयार्थ

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर आम आदमी पक्षाने 'इंडिया' आघाडीपासून वेगळे होत असल्याची घोषणा केली आणि विरोधकांच्या ऐक्यातील भुशभुशीतपणा उजागर झाला. लोकसभा निवडणुकीत रालोआचा मुकाबला करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विरोधकांच्या आघाडीत सध्या किती टोकाचे मतभेदाचे आहेत, हे यामुळे नव्याने समोर आले. 'इंडिया' आघाडी ही केवळ २०२४ च्या लोकसभेसाठी स्थापन झाली होती, असे आम आदमी पक्षाचे म्हणणे असून, भाजप आणि काँग्रेस यांच्यात छुपी युती असल्याचाही आरोप केला आहे. २०२३ मध्ये मध्यान्ही स्थापन झालेल्या डझनभर पक्षांच्या 'इंडिया' आघाडीच्या ऐक्याची पानगळ लवकरच सुरू झाली. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांचा जेडीयू आणि जयंत चौधरी यांच्या राष्ट्रीय लोकशाही दलाने लोकसभा निवडणुकीच्या अगोदरच सोडचिठ्ठी देऊन 'इंडिया' आघाडीला हादरे दिले. साहजिकच या आघाडीतून बाहेर पडताना काही राजकीय मतभेद निर्माण झाले असतील. पण अलिकडच्या काळात आम आदमी पक्षाने 'इंडिया' आघाडीकडे पाठ फिरवण्यामागे काँग्रेसशी असणारा संघर्ष हेच एकमेव आणि प्रमुख कारण आहे. प्रारंभीच्या काळात दिल्ली आणि नंतर पंजाबमध्ये काँग्रेसकडून सत्ता खेचून घेणाऱ्या आप पक्षाचे काँग्रेसशी असणारे मतभेद असणे स्वाभाविक होते, म्हणून 'इंडिया' आघाडी स्थापन होताना दोन्ही पक्षांत पडणाऱ्या ठिणग्यांचे आकलन सर्वांनाच होते.

दिल्लीत सलग १५ वर्षे राज्य करणाऱ्या काँग्रेस पक्षाची उपस्थिती शून्यावर येत असेल तर यात आम आदमी पक्षाचा सिंहाचा वाटा होता. गुजरात आणि गोवा येथे देखील आप पक्षाच्या हजेरीने काँग्रेसची मोठी हानी झाली आहे. तरीही भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा जोरदार मुकाबला करण्यासाठी आणि विरोधकांत ऐक्य राहावे यासाठी दोन्ही पक्ष 'इंडिया' आघाडीच्या बॅनरखाली एकत्र आले. मतभेदाचे अनेक सूर उमटत असताना 'इंडिया' आघाडीने काही प्रमाणात यशही मिळवले. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ३०३ जागा मिळवणाऱ्या भाजपाला २०२४च्या लोकसभा निवडणुकीत २४० जागांवर रोखता आल्याने विरोधकांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. परिणामी भाजपाचे घटक पक्षावरचे अवलंबित्व वाढले. अर्थात या आघाडीचा सर्वाधिक लाभ काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला झाला. त्यांना अनुक्रमे ५२ हून ९९ आणि पाचवरून ३७ जागा मिळाल्या. इथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल आणि ती म्हणजे काँग्रेस आणि आप पक्ष हे दिल्ली, हरियाना, गुजरात आणि चंडीगड येथे एकत्रपणे लोकसभा निवडणूक लढले. मात्र पंजाबमध्ये एकमेकाविरुद्ध. पंजाबमध्ये 'आप'ला प्रचंड बहुमत असून तेथे तो सत्ताधारी आणि काँग्रेस प्रमुख विरोधी पक्ष. अशा वेळी दोघांनी एकत्र येऊन निवडणूक लढण्याचा निर्णय घेणे हा कार्यकर्ते आणि मतदारांत गोंधळाचे वातावरण निर्माण करणारे होते. शिवाय दोन्ही पक्षांच्या प्रतिष्ठेवर प्रश्न निर्माण झाला असता. वास्तविक दिल्लीत दोघे एकत्र येऊनही भाजपाला सात जागा जिंकण्यापासून कोणी रोखू शकले नाही. लोकसभेला हरियानात काँग्रेसने दहापैकी पाच जागा जिंकल्या. चंडीगडमध्ये काँग्रेसचे मनीष तिवारी विजयी झाले.



● पोपट नाईकनवरे
राज्यशास्त्र अभ्यासक

एकार्थाने लोकसभा निवडणुकीत 'इंडिया' आघाडीचा आप पक्षाला फारसा लाभ झाला नाही. मात्र उभय पक्षांत ताणाताणी वाढली ती लोकसभेनंतर काही महिन्यांनी झालेल्या हरियाना विधानसभा निवडणुकीपासून. काँग्रेस-आप पक्षात जागावाटपावर चर्चा झाली. परंतु ती तडीस जावू शकली नाही. परिणामी हरियानात आपने ९० पैकी ८८ उमेदवार उभे केले. 'आप'ला तर दोन टक्के मते देखील मिळाली नाहीत. मात्र सत्तेच्या स्पर्धेत काँग्रेस भाजपाच्या तुलनेत एक टक्क्यापेक्षा कमी मतांच्या फरकाने मागे पडली. या निकालानंतरच काँग्रेस आणि आप पक्षात वाढलेला तणाव हा दिल्ली विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरोधात लढण्याचा निर्णय घेण्याइतपत शिगेला पोचला. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला भोपळाही फोडता आला नव्हता. काँग्रेसने यावेळी आखलेली निवडणूक रणनिती ही भाजपाच्या विरोधात कमी आणि 'आप'विरोधात अधिक दिसून आली. दोन्ही पक्षांत वैमनस्य एवढे वाढले की, आप पक्षाने काँग्रेसला 'इंडिया' आघाडीतून काढून टाकण्याची मागणी केली. 'आप'चा हिशोब चुकता करण्यासाठी काँग्रेसने दिल्लीत आखलेली रणनिती यशस्वी ठरली आणि त्याचा फायदा भाजपाला होत २७ वर्षांनंतर भाजपाची सत्तावापसी झाली. मतांची टक्केवारी आणि जागांचे गणित पाहिले तर आप अणि काँग्रेस एकत्र लढले असते तर कदाचित भाजपाला सहजासहजी सत्ता मिळाली नसती. अरविंद केजरीवाल यांनी आप पक्षाची कारकीर्द दिल्लीतून सुरू केलेली असताना सर्वात कमी वेळेत राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळवला. त्याचवेळी तिचा सत्तेतून पायउतारही झाला. अशावेळी आप पक्षाकडे आता आगामी निवडणुकीच्या राजकारणात गमावण्यासारखे फारसे काही नाही. त्याचवेळी तो गुजरात, गोवासह अनेक राज्यांत काँग्रेसचे निवडणुकीचे गणित मोडू शकतो.

आप पक्षाचे खासदार संजय सिंह यांनी 'इंडिया' आघाडीच्या कामकाजाच्या शैलीवर उपस्थित केलेले प्रश्न योग्य वाटू शकतात. परंतु फुटून बाहेर पडण्याचे खरे कारण हे काँग्रेसशी असलेले वैर होय. दुसरीकडे, 'आप'ची सक्रियता ही काँग्रेसशी थेट मुकाबला असलेल्या राज्यांत भाजपाच्या पथ्यावर पडणार आहे. प्रत्यक्षात भाजपा किंवा त्याच्या नेतृत्वाखालील आघाडीविरोधात जेवढे पक्ष मैदानात असतील, तेवढ्याच प्रमाणात विरोधकांच्या मतांत फाटाफूट होणारच. भाजपाविरोधी मतांची विभागणी टाळण्यासाठीच विरोधी पक्षाच्या ऐक्याची मोट बांधली होती. मात्र दोन वर्षांतच गाडी रुळावरून घसरलेली दिसून येते.

अर्थात आघाडीचे यशापयश सर्व घटक पक्षांचे सहकार्य, समन्वय अणि सामंजस्य यावर अवलंबून असते. यात सर्वात मोठा पक्ष या नात्याने काँग्रेसची भूमिका ही महत्त्वाची ठरते. जुलै २०२३ मध्ये 'इंडिया' आघाडीची स्थापना झाल्यानंतर किती बैठका झाल्या, हे आठवते का? संयोजक नेमण्याचे तर लांबच, आजपर्यंत समिती किंवा संघटनात्मक आराखडा तयार होऊ शकलेला नाही. दोन वर्षांत किमान समान कार्यक्रमही झाला नाही आणि संयुक्त प्रचार सभाही झाली नाही. 'आप' सह उत्तर भारतातील बहुतांश लहान पक्षांनी काँग्रेसच्या पारंपारिक मतदारांत फूट पाडली असून, ते स्वत:कडे वळविले आहे. आगामी लोकसभा निवडणूक आता २०२९ मध्ये आहे. मात्र त्यापूर्वीच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा विरोधकांच्या मनोधैर्यावरच नाही तर मतदारांच्या मनावरही दीर्घकाळ परिणाम होईल. ●●●

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# रमी ॲपचा डाव! तरुण पिढीवर घाव

तंत्रज्ञानाने सगळ्या जगाचाच ताबा घेतलेला आहे. दैनंदिन जीवनामध्ये वरदान ठरणारे हे तंत्रज्ञान तरुण पिढीसाठी शाप ठरू पाहते आहे. आज माहिती तंत्रज्ञानाचे युग तरुणांना अनेक प्रकारच्या संधी देणारे ठरले आहे. मात्र या तंत्रज्ञानाचा वापर स्वार्थासाठी किंबहुना सामाजिक विकृती निर्माण करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर होतो ही आज वस्तुस्थिती आहे. मग अगदी सायबर क्राईमपासून ते ऑनलाईन जुगारापर्यंत त्याचे थैमान पाहायला मिळते. जगात काय चालले आहे हे तर फार दूरच राहिले. परंतु प्रत्यक्ष आपल्या महाराष्ट्रातसुद्धा या ऑनलाईन जुगार, व्हिडिओ गेम, पत्त्यांचे खेळ या सगळ्यातून तरुण पिढीला बरबाद करण्याचा सपाटा सुरू झाल्याचे पाहायला मिळते. सध्या तर रमी खेळामध्ये वेगवेगळे ॲप आलेले आहेत. मग अगदी एका ॲपचे नाव जंगली रमी असे आहे. या खेळातून ज्यादा पैसे मिळवण्याचे आमिष दाखवले जाते. आणि तरुणांना त्यात अधिकाधिक गुंतवून अक्षरशः देशोधडीला लावण्याचा डाव खेळला जातो. गुजरातमधल्या सूरत तरसाडा भागामध्ये एका तरुणाने या रमीच्या नादापोटी तब्बल साठ लाख गमावल्याचे समोर आले आहे. अगदी बायकोचे दागिने विकण्यापासून ते आजीचे दागिने चोरण्यापर्यंत या रमी गेमवरच्या ॲपने त्याचे सगळे घर उद्ध्वस्त केले. बारामतीजवळच्याही एका खेड्यातला शेतकरी तरुण ऑनलाईन पत्त्यांचा गेम खेळला आणि ट्रॅक्टर, जमीन विकून दिवाळखोर झाला. कर्जतजवळच्या एका गावात इंजिनिअर असलेल्या तरुणाने जंगली रमीच्या नादी लागून तो कर्जबाजारी झाला. आणि कर्ज फेडता येत नाही म्हणून त्याला आत्महत्या करावी लागली. ठिकठिकाणी हे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घराघरात पोहोचते आहे. कमी श्रमात आणि कमी वेळात पैसा कमावण्याच्या आमिषापोटी तरुण वर्ग या चक्रव्यूहात अडकतो आहे. त्यासंदर्भात अलिकडेच आध्यात्मिक गुरू असलेले आणि अर्धशतकाहून जास्त पुस्तकांचे लेखक असलेल्या स्वामी सवितानंदांनी याविरोधात जनजागृती मोहीम सुरू केलेली आहे. आपल्या परिचितांना या भयंकर संकटाची कल्पना यावी म्हणून त्यांनी स्वतः माहितीवजा पत्र लिहून सावध होण्याची कळकळ व्यक्त केली आहे.

### स्वामी सवितानंदांचे आवाहन

आपल्या या माहितीवजा पत्रामध्ये त्यांनी असा स्पष्ट इशारा दिला आहे की, तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या अशा अनेक बातम्या वाचत असतो. परंतु आपल्याला काय त्याचे असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करतो. या निष्काळजीपणाचे संकट केव्हाही कोणाच्याही घरापर्यंत पोहोचू शकते. याचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी स्वामी सवितानंदांनी म्हटले आहे की, 'ॲक्सिडेंट नेव्हर्स हॅपन्स ऑदर्स ओन्ली'. म्हणजेच या भ्रमात राहू नका की अपघात नेहमी दुसऱ्यालाच होतील. आपल्याला होणार नाहीत. भलेही तुम्ही गाडी चालवत असा की, पायी चालत असा सतत सावध राहणं अत्यंत आवश्यक आहे. तरुण पिढीच्या भवितव्याची काळजी संघटितपणे घेणे आवश्यक आहे हे सांगत असतानाच स्वामी सवितानंदांनी सर्व गणेशोत्सव मंडळांना यासंदर्भात पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. गणेश मंडळांनी मंडपाच्या आत किंवा बाहेर फलक लावून व्हिडिओ गेम किंवा मोबाईलवर पैसे लावून जंगली रमीसारख्या ॲपपासून सावध राहण्याच्या सूचना कराव्यात. गणेशोत्सवात तरुणांचा सहभाग सर्वाधिक असतो. धक्कादायक भाग म्हणजे या रमी ॲपच्या जाहिराती करण्यासाठी अनेक नटनट्या आणि क्रिकेटपटू सरसावलेले आहेत. त्यांच्या जाहिराती करून ते लाखो रुपये कमावतात. परंतु त्यांच्या या जाहिरातींमुळे कोट्यवधी तरुण भयंकर चक्रव्यूहात अडकतात याची त्यांना कल्पना नसते. आश्चर्याची बाब म्हणजे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अशा ऑनलाईन गेमवर ज्यादा कर लादला आहे. याची कल्पना देताना स्वामी सवितानंदांनी दिलेले उदाहरण अतिशय महत्त्वपूर्ण ठरते. त्यांनी म्हटले आहे की, गोगलगाय किंवा गोम या प्राण्यांचा एक पाय जरी तुटला तरी त्यामुळे त्या लंगड्या होत नाहीत. त्यांना अनेक पाय असतात तसे या रमी किंवा जुगार खेळाचे आहे. देशातल्या काही राजकारण्यांची मुलेसुद्धा हे ॲप तयार करून किंवा त्याचा प्रसार करण्यासाठी कार्यरत असल्याची टीका होत आहे. हा सगळा तरुण पिढीची नासधूस करणारा धोका लक्षात घेऊन केंद्र आणि राज्य सरकारला हजारो सह्यांचे पत्र पाठवण्याचे आवाहनही याच लेखामधून सवितानंदांनी केले आहे.

### संतांची तळमळ

सवितानंदांसारख्या संतमहात्म्यांचे समाजातल्या विविध घटकांशी अनेक प्रवचनांमुळे प्रबोधनांमुळे संपर्क येत असतात. अशा विकृती किंवा दुष्प्रवृत्ती त्यांच्या कानावर टाकल्या जातात. स्वाभाविकपणे जनमानसाची ही व्यथा ऐकून ते अस्वस्थ होणे अत्यंत स्वाभाविक ठरते. आणि हीच अस्वस्थता त्यांनी आपल्या या लेखातून व्यक्त केली. विशेषतः तरुण पिढीचा हा होणारा विध्वंस सगळ्या समाजाचाच कडेलोट करणारा ठरू शकतो. ज्याप्रमाणे तुकाराम महाराजांनी 'बुडते हे जन देखवे ना डोळा, म्हणूनी कळवळा येता आम्हा।' असे म्हटले होते हीच तळमळ स्वामी सवितानंदांच्या या आवाहनपर पत्रामधून व्यक्त झाली आहे. प्रामुख्याने मोबाईलच्या या रमी ॲपने आपले पाय ग्रामीण भागापर्यंत पसरलेले आहेत. आणि त्याच्या तावडीत तरुण पिढी सहजपणे ओढली जाते आहे. हा सगळा रमी ॲपचा डाव तरुण पिढीवर घाव घालणाराच ठरतो आहे. ज्या क्रिकेट खेळाचे सर्वाधिक फॅन तरुण असतात त्या क्रिकेटपटूनी जुगारी ॲपच्या जाहिराती करू नयेत. उलट तरुणांना सावध करण्यासाठी पुढाकार घेण्याची वेळ आलेली आहे. पूर्वी पत्त्यांच्या नादी लागणाराही प्रकार होत होता. परंतु तंत्रज्ञानाने आता अनेक घरांनाच रमीचा अड्डा बनवण्याचा घाट घातलेला आहे. वेळीच सावध न झाल्यास तंत्रज्ञानाचे मालक होण्याऐवजी तरुणांना त्याचे गुलाम व्हावे लागेल.

---


**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**मुत्युनंतर माणूस चांगला होता असं म्हणण्याची प्रथा आहे.**
**फक्त जिवंतपणी माणूस ओळखता येत नाही हीच खरी व्यथा आहे.**

**पं चां ग**

**रविवार, १० ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण प्रतिपदा**
**नक्षत्र : धनिष्ठा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०२-१० मकर**
**०२-११ ते २४-०० कुंभ**



**रवी उदय- ०६-२०**
**रवी अस्त- १९-०८**

**आदित्य पूजन: श्री सिद्धारूढ स्वामी पुण्यतिथी-हुबळी; मेघमाला व्रतारंभ; ज्ञानेश्वरी पारायण प्रारंभ**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

---

## पाककृती



### ब्रोकोली सूप



★ **साहित्य -** १ टेस्पून बटर, ३०० ग्रॅम ब्रोकोलीचे तुरे (साधारण दीड कप लहान तुरे) १ मध्यम कांदा, चिरलेला (३/४ कप), १ मध्यम गाजर, चिरून, चवीनुसार मीठ आणि मिरपूड, १ टेस्पून मैदा, २ कप पाणी (टीप १), १/४ कप क्रीम (अर्ध्यापेक्षा अर्धे), क्रूटॉन्स

★ **कृती -** १) नॉनस्टिक पॅनमध्ये बटर गरम करावे. त्यात ब्रोकोली, कांदा आणि गाजर घालावे. थोडे मीठ आणि मिरपूडसुद्धा घालावी. मध्यम आचेवर कांदा थोडा पारदर्शक होईस्तोवर परतावे. साधारण ५ ते ६ मिनिटे. २) यामध्ये मैदा घालून दोन मिनिटे परतावे. पाणी घालून उकळी काढावी. मध्यम आचेवर १० मिनिटे उकळी काढावी. ३) क्रीम घालून ढवळावे. मिक्सरमध्ये प्युरी करावी. मीठ मिरपूड ॲडजेस्ट करावे. १ ते २ मिनिटे गरम करून सूप सर्व्ह करावे. सर्व्ह करताना बरोबर तळलेले किंवा बेक केलेले ब्रेडचे तुकडे (क्रूटॉन्स) द्यावे.

★ **टीप -** १) पाण्याऐवजी व्हेजिटेबल स्टॉक किंवा चिकन स्टॉक वापरता येईल.

---



# बंगळुरूजवळ नवीन क्रिकेट स्टेडियम बांधणार
## कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांची घोषणा



**बंगळुरूजवळ एक नवीन क्रिकेट स्टेडियम बांधण्याची घोषणा कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली. या स्टेडियममध्ये एकाच वेळी ८० हजार प्रेक्षक बसण्याची क्षमता असणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमनंतर हे देशातील दुसरे सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम असेल.**

■ बंगळुरू

कर्नाटक गृहनिर्माण मंडळाच्या सूर्या सिटी, बोम्मासंद्रा येथे सिद्धरामय्या यांनी स्टेडियम बांधण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. हे स्टेडियम १६५० कोटी रुपये खर्चून बांधले जाईल. हे नवीन स्टेडियम विद्यमान एम चिन्नास्वामी स्टेडियमपासून २२ किमी अंतरावर असून हे स्टेडियम १०० एकरवर बांधले जाईल.या १,६५० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचा संपूर्ण खर्च कर्नाटक गृहनिर्माण मंडळाकडून उचलला जाईल.यात केवळ क्रिकेट मैदानच नाही, तर ८ इनडोअर आणि ८ आउटडोअर खेळांसाठी सुविधा, एक आधुनिक जिम, प्रशिक्षण केंद्र, स्विमिंग पूल, गेस्ट हाऊस, हॉस्टेल, हॉटेल आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांसाठी एक कन्व्हेन्शन हॉल देखील असणार आहे. हे स्टेडियम बंगळुरूमधील बीसीसीआयच्या नवीन राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए) सारखे असू शकते. एम. चिन्नास्वामी मोठ्या कार्यक्रमांसाठी योग्य नाही.बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी करणाऱ्या न्यायमूर्ती जॉन मायकल कुन्हा आयोगाने म्हटले होते की, ३२,००० प्रेक्षकांची क्षमता असलेले आणि फक्त १७ एकर जागेत पसरलेले एम. चिन्नास्वामी स्टेडियम मोठ्या स्पर्धांसाठी योग्य नाही. आयोगाने असे सामने अधिक जागा,चांगल्या सुविधा आणि पार्किंग असलेल्या ठिकाणी आयोजित करावेत असा सल्ला दिला होता. ११ ऑगस्टपासून सुरू होणारी देशांतर्गत टी-२० लीग महाराजा ट्रॉफी म्हैसूरला हलवण्यात आली आहे. कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनला (केएससीए) पोलिसांकडून परवानगी न मिळाल्यामुळे महाराजा ट्रॉफी म्हैसूरमध्ये आयोजित करण्यात येत आहे. यानंतर २०२६ मध्ये येथे महिला विश्वचषक सामने आणि आयपीएल सामने आयोजित करण्यावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. जूनमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (ठउइ) च्या आयपीएल विजयाच्या उत्सवादरम्यान चिन्नास्वामी स्टेडियमभोवती झालेल्या चेंगराचेंगरीमुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. या घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता आणि ५० हून अधिक लोक जखमी झाले होते.

# चेन्नई सुपर किंग्जमध्ये मोठे बदल अनेक खेळाडूंना बाहेरचा रस्ता?

■ चेन्नई

इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी चेन्नई सुपर किंग्ज त्यांच्या संघात अधिक आक्रमकता आणण्याची योजना आखत आहे.चेन्नई त्यांच्या पर्समध्ये वाढ करण्यासाठी काही खेळाडूंना सोडू शकते, जेणेकरून मोठ्या खेळाडूंना लिलावात समाविष्ट करता येईल. पुढील हंगामापूर्वी चेन्नई व्यवस्थापनाचे लक्ष्य एक संतुलित आणि मजबूत संघ तयार करणे आहे. गेल्या हंगामात चेन्नई संघाची कामगिरी खूपच वाईट राहिली.चेन्नईने १४ पैकी फक्त ४ सामने जिंकले आणि पॉइंट टेबलमध्ये १० व्या स्थानावर शेवटचे स्थान पटकावले. महेंद्रसिंग धोनी पुढील हंगामातही खेळण्याची शक्यता आहे.संघ काही खेळाडूंना सोडू शकतो.भारताचा ऑफ-स्पिनर आर अश्विन (९.७५ कोटी)संघातून बाहेर पडणे निश्चित आहे.त्याच वेळी,डेव्हॉन कॉनवे (६.२५ कोटी),रचिन रवींद्र (४ कोटी), राहुल त्रिपाठी (३.४ कोटी), सॅम करन (२.४ कोटी रुपये), गुर्जपनीत सिंग (२.२ कोटी), नाथन एलिस (२ कोटी), दीपक हुडा (१.७५ कोटी), जेमी एव्हर्टन (१.५ कोटी) आणि विजय शंकर (१.२ कोटी) यासारख्या खेळाडूंचे भविष्यही प्रश्नचिन्हात आहे. संघाने या खेळाडूंना सोडले तर संघाकडे ३४.४५ कोटी रुपये असू शकतात.

# स्क्वॅश स्पर्धेत भारताची तन्वी खन्ना उपविजेती

■ जयपूर

स्क्वॅश इंडिया टूरवरील जयपूर येथे झालेल्या स्क्वॅश स्पर्धेत महिलांच्या एकेरीत भारताची स्क्वॅशपटू तन्वी खन्नाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.महिला एकेरीच्या अंतिम सामन्याला शौकिनांची गर्दी होती.इजिप्तची टॉप सिडेड नूर खाफगीने भारताच्या तन्वी खन्नाचा ३-१,(११-३,५-११,११-५,१२-१०)अशा गेम्समध्ये पराभव करत उपविजेतेपद पटकाविले.मात्र इजिप्तच्या नूर खाफगीने अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केला.भारताच्या २९वर्षीय तन्वी खन्नाला या स्पर्धेतील पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली होती.त्यानंतर दुसऱ्या सामन्यात तन्वीने आपल्याच देशाच्या रतिका सिलेनचा ३-०(११-५,११-३,११-१) अशा गेम्समध्ये पराभव केला.

# न्यूझीलंडच्या संघाची विक्रमाला गवसणी! झिम्बाब्वे १ डाव ३५९ धावांनी पराभूत

■ हरारे

न्यूझीलंड संघाने दुसऱ्या कसोटी सामन्यात झिम्बाब्वेवर अडीच दिवसात विजय मिळवून मोठ्या विक्रमाला गवसणी घातली. झिम्बाब्वेच्या पहिल्या डावातील १२५ धावांच्या प्रत्युत्तरात न्यूझीलंडने ३ बाद ६०१ धावांवर डाव घोषित केला.त्यानंतर न्यूझीलंडने झिम्बाब्वेचा दुसरा डाव ११७ धावांवर गुंडाळून एक डाव ३५९ धावांनी विजय मिळवून मालिका २-० अशी खिशात घातली. कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील हा सर्वात मोठा डावाच्या फरकाने मिळवलेला तिसरा सर्वात मोठा विजय ठरला. ४७६ धावांच्या पिछाडीवर असलेला झिम्बाब्वेचा दुसरा डाव ११७ धावांवर गडगडला. पहिल्या डावात ४ गडी बाद करणार्या फॉक्लेसने दुसर्या डावात ९ षटकांत ५ गडी बाद केले. मॅट हेन्री आणि जेकब डफी यांनी प्रत्येकी जोन विकेट घेतले. झिम्बाब्वेकडून दुसर्या डावात निक वेल्थने नाबाद ४७ धावांची खेळी केली.



# पागोटेच्या जलतरण स्पर्धेत आर्यन मोडखरकर अव्वल

■ उरण

पागोटेच्या सरपंच कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून केलेल्या जलतरण स्पर्धेत आर्यन मोडखरकर हा स्पर्धक अव्वल ठरला. या स्पर्धेसाठी माजी आमदार मनोहरशेठ भोईर, भावनाताई घाणेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेतून लोक गावात येऊन आपले पागोटे गाव आणि आपल्या गावाची ओळख सर्वांना व्हावी, हा एक हेतू सरपंच कुणाल पाटलांचा या स्पर्धा घेण्यामागे होता. या स्पर्धा अधिक रंजक होण्यासाठी स्टेप आर्ट डान्स अकादमी यांच्या वतीने नृत्य कलाआविष्कार सादर करण्यात आले. तर दहीहंडी पथकांच्या वतीने मानवी मनोरे रचून दहीहंडी खेळाचे थरारक प्रात्यक्षिके दाखविली. गटवारी घेण्यात आलेल्या जलतरण स्पर्धा अत्यंत चुरशीच्या झाल्या. या गटामध्ये चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला तेजस शिंदे, तर तिसरा क्रमांक वेदांत पाटलाने पटकावला. दुसऱ्या क्रमांकाचे स्थान जयदीप सिंग याने मिळवले असून, आर्यन मोडखरकरने या स्पर्धेचे अव्वल स्थान प्राप्त केले आहे.

# गिलने स्वाक्षरी केलेल्या जर्सीला ५.४१ लाख रुपयांची बोली

■ लंडन

भारतीय कसोटी कर्णधार शुभमन गिलने स्वाक्षरी केलेल्या जर्सीला ५.४१ लाखांची सर्वाधिक बोली लागली. इंग्लंडचा माजी कर्णधार एंड्रयू स्ट्रॉसची पत्नी रुथ स्ट्रॉस यांच्या स्मरणार्थ दरवर्षी लॉर्ड्स कसोटीमधील एक दिवस रेड फॉर रुथ फाउंडेशनला समर्पित केला जातो. रुथ स्ट्रॉस यांचे कॅन्सरमुळे निधन झाले होते. याच फाउंडेशनसाठी आयोजित करण्यात आलेल्या लिलावात शुभमन गिलने स्वाक्षरी केलेली जर्सी सर्वाधिक ५.४१ लाख रुपयांमध्ये विकली गेली. या लिलावात भारतीय संघ आणि इंग्लंडच्या खेळाडूंचा समावेश होता.या लिलावात जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांची जर्सी ४,२०० पाऊंड म्हणजे ४.९४ लाख रुपयांना आणि के.एल. राहुलची जर्सी ४ हजार पाऊंड म्हणजेच ४.७० लाख रुपयांना विकली गेली. जो रूटची स्वाक्षरी असलेली जर्सी ३.८०० पाऊंड म्हणजेच ४.४७ लाख रुपयांना,बेन स्टोक्सची जर्सी ३,४००पाऊंड म्हणजेच ४ लाख रुपयांना आणि जो रुटची स्वाक्षरी असलेली टोपी ३,००० पाऊंड म्हणजे ३.५२ लाख रुपयांना विकली गेली,

# विनायक निम्हण स्मृती कॅरम स्पर्धा! राजेश गोहिल चौथ्या फेरीत दाखल

■ पुणे

पुण्यात गोविंदा गार्डन मंगल कार्यालय येथे सुरू असलेल्या विनायक निम्हण स्मृती दुसऱ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या तिसऱ्या फेरीत रायगडच्या राजेश गोहिलने पुण्याच्या फैयाज शेखचा १९-१२,२५-८ असा सरळ दोन सेटमध्ये पराभव करून चौथ्या फेरीत प्रवेश केला. तर मुंबईच्या सिद्धांत वाडवलकरने पुण्याच्या वासिम शेखचा तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत १३-२५,२५-६,२१-९ असा पराभव करून चौथी फेरी गाठली. प्रशांत मोरेने नंदू सोनावणेवर २५-०, २१-१५, महम्मद घुफ्राने कमलेश राठोडवर २५-७, २५-२, हिदायत अंसारीने सुखबीरसिंग कटनोरियावर २५-१२, २५-११, अभिजित त्रिपनकरने रवी धिंग्रावर २३-१५, २५-०, रियाझ अकबर अलीने निकुल काकडेवर २१-६, १४-१५, २५-८, इकबाल कुरेशीने महम्मद वाजिद पाशावर ११-२३, २५-२०, २५-६, नीरज कांबळेने रहीम करीम खानवर २२-७, ७-२५, २०-१२, नीलांश चिपळूणकरने रहीम हजारी शेखवर ८-१८, १९-१२, २५-४, योगेश परदेशीने रोहित मिरजकरवर २५-०, २५-०, सागर भोसलेने अमोल सावर्डेकरवर २५-१८, २५-०, आयुष्य गरुडने जाफर शेखवर २५-१९, २५-६ असा विजय मिळवला.



# शिव लिंगाष्टकम स्तोत्रम्



ब्रह्ममुरारि सुरार्चित लिंगं
निर्मलभासित शोभित लिंगम् ।
जन्मज दु:ख विनाशक लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

देवमुनि प्रवरार्चित लिंगं
कामदहन करुणाकर लिंगम् ।
रावण दर्प विनाशन लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

सर्व सुगंध सुलेपित लिंगं
बुद्धि विवर्धन कारण लिंगम् ।
सिद्ध सुरासुर वंदित लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

कनक महामणि भूषित लिंगं
फणिपति वेष्टित शोभित लिंगम् ।
दक्ष सुयज्ञ निनाशन लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

कुंकुम चंदन लेपित लिंगं
पंकज हार सुशोभित लिंगम् ।
संचित पाप विनाशन लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

देवगणार्चित सेवित लिंगं
भावै-र्भक्तिभिरेव च लिंगम् ।
दिनकर कोटि प्रभाकर लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

अष्टदलोपरिवेष्टित लिंगं
सर्वसमुद्भव कारण लिंगम् ।
अष्टदरिद्र विनाशन लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

सुरगुरु सुरवर पूजित लिंगं
सुरवन पुष्प सदार्चित लिंगम् ।
परात्परं परमात्मक लिंगं
तत्-प्रणमामि सदाशिव लिंगम् ।।

लिंगाष्टकमिदं पुण्यं य: पठेश्शिव सन्निधौ।
शिवलोकमवाप्नोति शिवेन सह मोदते ।।

## तिसरा सोमवार शिवामूठ-मूग





# सुख शांती समाधान

# श्रीकृष्ण कृपेसाठी जन्माष्टमी अशी साजरी करा

**श्रीकृष्णाचा जन्म अष्टमीला रोहिणी नक्षत्र असताना कंसाच्या बंदिशाळेत, गोकुळात झाला म्हणून या दिवसाला गोकुळाष्टमी म्हणतात. श्रावण महिन्यात वद्य अष्टमी या तिथीला जन्माष्टमी साजरी केली जाते. श्रीकृष्णाची जयंती ही गोकुळाष्टमी किंवा जन्माष्टमी म्हणून ओळखली जाते. जन्माष्टमी केवळ भारतात नव्हे तर पूर्ण जगात मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. श्रीकृष्णाला अनेक नावांनी ओळखले जाते. नटखट, कान्हा, गोपाळा, आदी अशा अनेक नावाने श्रीकृष्ण भगवान ओळखले जातात. श्रीकृष्णाचा रात्री १२ वाजता जन्म होतो.**

रात्री १२ वाजता श्रीकृष्णाची पूजा करून हा सण साजरा करतात. जर तुम्ही जन्माष्टमीच्या दिवशी प्रेमाने, भक्तीभावाने देवाची पूजा केली तर ते खूप प्रसन्न होतात. त्यांच्या भक्तांवर त्यांचा आशीर्वाद सदैव राहतो. तसेच, त्यांचे सर्व दु:ख दूर करतात. या दिवशी विविध खाद्यपदार्थ दही, दूध, लोणी एकत्र करून कालवणे म्हणजेच काला होय. यालाच दहिकाला असे म्हणतात. या दिवशी दहिकाला करून खाण्याचा प्रघात आहे. श्रीकृष्णाचा हा आवडता खाद्यपदार्थ होता. जर तुम्हालाही या जन्माष्टमीच्या दिवशी देवाला संतुष्ट करायचे असेल आणि त्यांचे आशीर्वाद मिळवायचे असतील तर पूजा करताना खालील काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात.



जन्माष्टमीच्या दिवशी रात्री १२ वाजता काकडीसह श्रीकृष्णाचे बाल रुपात जन्मोत्सव साजरा करा. काकडीला देवकी मातेच्या गर्भाचे प्रतीक मानले जाते.

श्रीकृष्णाच्या जन्मानंतर शंखात दूध ओतून त्यांचा अभिषेक करा. यामुळे देव अत्यंत प्रसन्न होतात. तसेच तुम्ही दूध, दही, तूप, मध आणि गंगाजल यातून तयार केलेल्या पंचामृतानेही अभिषेक करा. अभिषेक केल्यानंतर बालश्रीकृष्णाला नवीन कपडे घाला, मुकुट घालून, तयार करून झोपाळ्यात ठेवा व पाळणा म्हणा.

तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी गरजूंना फळे आणि धान्य दान करा.

बाळगोपाळासाठी बासरी आणि मोराची पिसे आणा. पूजेच्या वेळी देवाला ते अर्पण करा.

जन्माष्टमीच्या दिवशी कान्हाला लोणी आणि साखरेचे नैवेद्य अर्पण करा. तसेच बाळगोपाळाच्या पूजेत तुळशीचा वापर नक्की करा. आपल्या बोटाने एक ते पाच वर्षांच्या कोणत्याही मुलाला लोणी आणि साखर खाऊ घाला. या दिवशी गाय-वासराची मूर्ती घरी आणा आणि पूजास्थळी ठेवून त्यांची पूजा करा. जर घराच्या आसपास कुठे गाय असेल तर गाईची सेवा करा. तिला चारा खायला द्या किंवा भाकरी बनवून खाऊ घाला आणि तिचे आशीर्वाद घ्या. श्री कृष्ण एक ग्वाला होता, म्हणून गाईची पूजा करणाऱ्यांवर तो खूप प्रसन्न होतो.

देवाला पिवळे चंदन लावा. पिवळे कपडे घाला, पिवळी फुले श्रीकृष्णाला अर्पण करा. कृष्णकमळाच्या फुलांमध्ये श्रीकृष्णाची पवित्रके आकर्षित करण्याची क्षमता सर्वांत अधिक असल्याने ही फुले श्रीकृष्णाला वाहावीत. जन्माष्टमीचा दिवस भगवान श्रीकृष्णाची विशेष स्तुती करण्याचा या दिवशी देवाचे भक्त आपल्या प्रभूला प्रसन्न करण्यासाठी अनेक दिवस अगोदरपासून या दिवसाची तयारी



सुरू करतात. गोकुळाष्टमीच्या दिवशी, लोक भगवान श्रीकृष्णासाठी उपवास ठेवतात आणि त्यांच्या जन्माच्या वेळी म्हणजेच मध्यरात्री १२ वाजता त्यांची पूजा करतात. सुका मेवा, मिठाई आणि ५६ प्रकारचे भोग अर्पण करतात आणि पूजेनंतर उपवास सोडतात. दुसऱ्या दिवशी दहिहंडी हा उत्सव सगळीकडे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

टीप- या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

## सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्प! नांदेडच्या शेतकऱ्यांचा विरोध

■ नांदेड



**नांदेडच्या** हिमायतनगर तालुक्यातील सिरपल्ली येथे सहस्त्रकुंड जलविद्युत प्रकल्पाविरोधात आज शेतकऱ्यांनी जोरदार आंदोलन केले. धरणविरोधी संघर्ष समितीतर्फे शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी महाएल्गार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नदीकाठच्या स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि विविध सामाजिक संघटनांनी या प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शविला आहे.

राज्य सरकारने नांदेडच्या किनवट येथील पैनगंगा नदीवर या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. यामुळे नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यातील तब्बल ४० गावांतील सुपीक जमीन पाण्याखाली जाणार आहे. मागणी नसताना हा प्रकल्प का आणला? जलविद्युत निर्मितीसाठी सुपीक जमीन का गमवावी? असा सवाल शेतकऱ्यांनी केला. यावेळी शेतकरी म्हणाले की, पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेल्या हिमायतनगर - उमरखेड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील सहस्त्रकुंड जलविद्दूत प्रकल्पच्या मंजुरीमुळे नदीकाठच्या शेतकरी बांधवात संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. सरकारने तत्काळ हा प्रकल्प रद्द करावा. या प्रकल्पामुळे हजारो हेक्टर शेती बाधित होऊन शेतकरी उद्ध्वस्त होणार आहे. तसेच नैसर्गिक संपत्तीचाही ऱ्हास होईल. सरकारने आमचा आवाज ऐकला नाही, तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करणार.

## अहिल्यानगरात गणेश मंडळांना उद्यापासून ऑनलाईन मंडप परवाने

■ अहिल्यानगर

**गणेशोत्सव** व अन्य सण-उत्सव काळात मंडप उभारणी, स्वागत कमानी, रनिंग मंडपसाठी सर्व परवाने आता एकाच क्लिकवर मिळणार आहेत. पालिका,महावितरण व शहर वाहतूक शाखा यांच्यातर्फे संयुक्तपणे एक खिडकी योजनेचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. त्यासाठी अहिल्यानगर पालिकेच्या संकेतस्थळावर गणेश मंडळांना विनाशुल्क परवानगीची सुविधा ११ ऑगस्टपासून सुरू होणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

हे परवाने देण्यासाठी अतिक्रमण निर्मूलन विभागात एक खिडकी योजना राबवली जात होती. मागील वर्षीपासून स्वतंत्र संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. त्यावरून परवाने दिले जात आहेत. याहीवर्षी संकेतस्थळावरून परवाने दिले जाणार आहेत. मात्र, जागामालक अथवा सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र, तसेच स्थानिक पोलीस ठाण्याची परवानगी गणेश मंडळांना त्यांच्या स्तरावर घ्यावी लागणार आहे. उत्सव काळात मंडपाची उंची ४० फुटांपेक्षा जास्त नसावी. ४० फुटांपेक्षा जास्त उंचीचा मंडप उभारणार असल्यास सुरक्षिततेसाठी अधिकृत स्थापत्य अभियंत्याकडून स्टॅबिलिटी सर्टिफिकेट जोडावे लागणार आहे.

## मडगावात ब्लिंकिट कंपनीच्या डिलिव्हरी बॉईजची निदर्शने

■ मडगाव

**दक्षिण** गोवा जिल्ह्यातील मडगाव - आके येथील ब्लिंकिट या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभाराविरुद्ध जोरदार निदर्शने केली. कमी प्रोत्साहन भत्ता देऊन कोणतेही कारण नसताना डिलिव्हरी बॉईजना कामावरून काढले जात असल्याचा आरोप या कर्मचाऱ्यांनी केला आहे.

ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे वस्तू घरोघरी पोहोचवणाऱ्या आके मडगाव येथील ब्लिंकिट कंपनीचे आऊटलेट आहे. याठिकाणी काम करणाऱ्या डिलिव्हरी बॉयजनी कंपनी व्यवस्थापन अन्याय करत असल्याचा आरोप करत निदर्शने केली. यातील कर्मचारी प्रमुख सादिक हैदर म्हणाला की,कंपनीचे व्यवस्थापक व शाखा व्यवस्थापक हे मनमानी कारभार करत आहेत.

यापूर्वी दिवसाला ३० डिलीव्हरी केल्यानंतर दोन ते तीन हजारांचा फायदा होत होता. त्यामुळे गाडीचा खर्च, इंधन व इतर खर्च वजा केल्यानंतरही काही पैसे उरत होते. मात्र आता दिवसाला ३२ डिलिव्हरी केल्यानंतरही ५०० रुपयांचा फायदा होतो. याबाबत विचारणा केली तर थेट कामावरून काढून टाकले जात आहे.तरी आता राज्य सरकारनेच आम्हाला न्याय द्यावा,अशी मागणी आहे.

## स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीरमध्ये धाडसत्र

**श्रीनगर** - स्वातंत्रदिनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि सैन्य दलाच्या पथकांनी एकाच वेळी संशयित दहशतवाद्यांच्या २६ ठिकाणांवर छापे टाकले. हिजबूल मुजाहिदीनचा कमांडर महंमद अमिन भट उर्फ जहांगीर सरुरी याच्या घराचाही त्यात समावेश आहे. सरुरी हा काश्मीरमधील बरीच वर्षे पोलिसांच्या तावडीत न सापडलेल्या दहशतवाद्यांपैकी एक आहे. आज छापे टाकलेली ठिकाणे ही या संशयित दहतवाद्यांची घरे आहेत. मात्र, ते काही वर्षांपूर्वी पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात पळून गेले आहेत. त्यातील काही संशयित हे दहशतवादी संघटनांचे भूमिगत सदस्य आहेत. काही जणांवर सीमेपलीकडून जम्मू आणि काश्मीरमध्ये शस्त्रास्त्रांच्या तस्करीत गुंतल्याचा संशय आहे


### अनुसूची-I फॉर्म ए जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**पुष्पक ऑक्झिकेम प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | पुष्पक ऑक्झिकेम प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | ०१.०६.१९९२ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी-मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U99999MH1992PTC067011 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | २४१/बी-२, कस्तुरी प्लाझा, २रा मजला, मानपाडा रोड, ठाणे, डोंबिवली पूर्व, महाराष्ट्र, भारत, ४२१२०१. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | ०७.०८.२०२५ (आदेश ०८.०८.२०२५ रोजी प्राप्त) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०३.०२.२०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | सब्बानी मारुथी IBBI/IPA-001/IP-P-02752/2022-2023/14202 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | पत्ता: न्यू म्हाडा ईडब्ल्यूएस टॉवर्स, ब्लॉक ३सी, सदनिका क्र. ३०३, बांगुरनगर, गोरेगाव (प), मुंबई उपनगर, महाराष्ट्र, ४००१०४. ईमेल : Maruthi.Sabbani18@Gmail.Com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | ईमेल: IP@PUSHPAKCIRP.COM पत्ता: न्यू म्हाडा ईडब्ल्यूएस टॉवर्स, ब्लॉक ३सी, सदनिका क्र. ३०३, बांगुरनगर, गोरेगाव (प), मुंबई उपनगर, महाराष्ट्र, ४००१०४. |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २१.०८.२०२५ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | उपलब्ध नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | उपलब्ध नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल: | वेब लिंक: https://ibbi.gov.in/en/home/downloads भौतिक पत्ता: लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, **राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण** यांनी दि. ०७.०८.२०२५ रोजी पुष्पक ऑक्झिकेम प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
पुष्पक ऑक्झिकेम प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. २१.०८.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिश:, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

दिनांक: १०.०८.२०२५ सब्बानी मारुथी
ठिकाण: मुंबई IBBI/IPA-001/IP-P-02752/2022-2023/14202



### फॉर्म ए जाहीर उद्घोषणा

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

**थीम डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| | संबंधित तपशील | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | थीम डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | २७ सप्टेंबर, २००६ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी-मुंबई, महाराष्ट्र |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्र. | U45201MH2006PTC164958 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ३०२-३०३, अभिमान II, फॉरेस्ट ऑफीससमोर, तीन हात नाका, ठाणे-पश्चिम, नौपाडा (ठाणे), महाराष्ट्र, भारत, ४००६०२. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | आदेशाचा दिनांक: ०८ ऑगस्ट, २०२५ (एनसीएलटी वेबसाईटवरून डाऊनलोड करण्यात आला) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | ०४ फेब्रुवारी, २०२६ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | देबी प्रसन्ना सरंगी IBBI/IPA-002/IP-N00158/2017-2018/10405 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. १२५, भूमी मॉल, प्लॉट क्र. ९, सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र, ४००६१४. ईमेल : debi.sarangi@judilegalcombine.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | कार्यालय क्र. १२५, भूमी मॉल, प्लॉट क्र. ९, सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, महाराष्ट्र, ४००६१४. ईमेल: cirp.themedevelopers@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २४ ऑगस्ट, २०२५ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोचे वर्ग, जर असल्यास. | आयआरपीकडे उपलब्ध माहितीनुसार प्रसिद्धी होईपर्यंत माहित नाही |
| १३. | वर्गामध्ये धनकोचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल: | वेब लिंक: https://ibbi.gov.in/in/home/downloads भौतिक पत्ता: लागू नाही |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दि. ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी **थीम डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड**ची कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया (सीआयआरपी) सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
**थीम डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड**च्या धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. २४ ऑगस्ट, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
आर्थिक धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिश:, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
नोंद क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित वित्तीय कर्जदाराने, फॉर्म सीएमधील वर्गाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहण्याकरिता नोंद क्र. १३ समोर नमूद तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून अधिकृत प्रतिनिधी (वर्ग नमूद करावा) म्हणून त्यांची पसंती नमूद करावी. - लागू नाही
दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

सही/-
दिनांक: ०९ ऑगस्ट, २०२५ देबी प्रसन्ना सरंगी
ठिकाण: मुंबई अंतरिम ठराव व्यावसायिक
आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPA-002/IP-N00158/2017-2018/10405
एएफए क्र.: AA2/10405/02/311226/203950 वैधता ३१.१२.२०२६ पर्यंत



### ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

(पूर्वीची ओरिएंटल वेनीर प्रोडक्ट्स लिमिटेड)
सीआयएन: L35100MH1991PLC060686
नोंदणीकृत कार्यालय: गाव अघाई, द्वारा कल्याण रेल्वे स्टेशन, ठाणे - ४२१ ६०१. दूरध्वनी क्र.: ०२२-६१३८९४००;
फॅक्स क्र.: ०२२-६१३८९४०१ ईमेल: compliance@orientalrail.co.in वेबसाईट: www.orientalrail.com

**दि. ३० जून, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिककरिता अ-लेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षाच्या विवरणपत्राचा सारांश**

₹ लाखात (ईपीएस वगळता)

| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०-०६-२०२५ | ३१-०३-२०२५ | ३०-०६-२०२४ | ३१-०३-२०२५ |
| | | अ-लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | अ-लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १ | कार्यातून महसूल | ११,७९०.४३ | १४,०२०.७५ | १२,३०५.८० | ६०,२२१.५५ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | ८३०.८८ | १,१९९.६७ | ७९०.३० | ४,४४०.१७ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | ८३०.८८ | १,१९९.६७ | ७९०.३० | ४,४४०.१७ |
| ४ | कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात) | ५८७.३८ | ५३७.३८ | ५८५.६८ | २,९२१.५९ |
| ५ | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट) | ५८७.३८ | ५३७.३८ | ५८५.६८ | २,९२१.५९ |
| ६ | भरणा केलेले सम भाग भांडवल | ६४५.५९ | ६४५.५९ | ६१४.५९ | ६४५.५९ |
| ७ | इतर सम भाग | | | | |
| ८ | प्रति भाग उत्पन्न (दर्शनी किंमत रु. १/- प्रत्येकी) | | | | |
| | मूळ | ०.९१ | ०.८३ | ०.९५ | ४.६८ |
| | सौम्यीकृत | ०.९१ | ०.८३ | ०.९५ | ४.६८ |

स्वतंत्र तत्त्वावर वित्तीय निष्कर्ष खालीलप्रमाणे (₹ लाखात)


| अ. क्र. | तपशील | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०-०६-२०२५ | ३१-०३-२०२५ | ३०-०६-२०२४ | ३१-०३-२०२५ |
| | | अ-लेखापरिक्षित | लेखापरिक्षित | अ-लेखापरिक्षित | लेखापरिक्षित |
| १ | कार्यातून महसूल | ३,४४८.९७ | ४,१२१.३४ | ४ १०४.९३ | १५,३१५.९४ |
| २ | कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्व) | ३४३.६४ | ४८०.०३ | ३६०.९२ | १,४४०.८५ |
| ३ | कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात) | २२२.६२ | ३२२.९३ | २६५.४५ | १,०२८.८९ |

टिपा:
१. उपरोल्लेखित वित्तीय निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे त्यांच्या दि. ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी पार पडलेल्या सभेमध्ये त्यास मंजुरी देण्यात आली. वरील वित्तीय निष्कर्षाचे वैधानिक लेखापरिक्षकांनी मर्यादित पुनरावलोकन केले आहे.
२. वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिककरिता वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. जून ३०, २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिककरिता वित्तीय निष्कर्षाचे विस्तृत प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाईट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाईट www.orientalrail.com/ वरही उपलब्ध आहे.
३. कंपनी मुख्यत्वे "भारतीय रेल्वे उत्पादने" या एकमेव विभागात कार्यरत आहे आणि म्हणून विभागीय तपशील प्रसिद्ध करणे आवश्यक नाही.
४. वर्तमान कालावधी/वर्षाच्या सादरीकरणाची पुष्टी करण्याकरिता मागील कालावधी/वर्षाची आकडेवारी नव्या स्वरुपात / पुनर्गठित करण्यात आले आहेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ०८ ऑगस्ट, २०२५

ओरिएंटल रेल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या संचालक मंडळाच्या वतीने आणि त्यांच्या करिता
सही/-
करीम एन. मिठीबोरवाला
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७१३२६

# नवाकाळ शब्दकोडे-१३३८



**आडवे शब्द –**

१. अतिशय मोठ्या आकाराचा ५. नाक आणि फुफ्फुसांना जोडणारा अवयव ९. तबकात पाच निरांजने ठेवून केलेली आरती ११. नर्तकी अथवा गायकाला साथ करणारा वादक १२. लांबचा, अंतरावर असलेला १३. अभिप्राय १४. आख्यायिका १७. खिरा, वाळूक १८. प्रखर १९. दुधाचा हा पदार्थ भाजीत वापरतात २१. पुष्कळ २३. केविलवाणा २४. सोपे २५. चरबी २६. कौशल्याची कामे करणारा २८. रामाचा पुत्र ३०. सूड, उट्टे ३१. जेव्हा ३३. केसांचा कृत्रिम रंग ३५. पूर्वी युद्धाच्या वेळी वाजवली जाणारी वाद्ये ३६. चंद्राच्या कला; मुलींचे एक नाव ३८. पडके व ओसाड घर ४०. बारीक दगड, उभा ठाकलेला ४२. ओटा, चबुतरा ४३. लहर ४५. कमळांचे तळे, विष्णू ४७. नौबत ४८. पर्वत, डोंगर ५०. कडोसरी ५४. सुंदर युवती ५७. ताप, आजारपण ५८. वृद्धी, विकास ५९. कायदा-सुव्यवस्था नसलेला समाज ६०. राठ, निबर ६१. पसरलेला सुगंध ६३. स्वतंत्र टुमदार घर ६४. कफनी ६६. बाज विणण्यासाठी जाड सुती पट्टी ६८. अगदी सुरुवातीचा ७०. वस्तू, जिन्नस ७१. कष्टांची आवड असलेला ७३. रस्ता, मार्ग ७५. मागचे वर्ष ७६. विठ्ठलाचे भक्त ७७. करंजीच्या पोटातील भाग ७८. घोडा ७९. छिद्र ८०. कौशल्य ८१. चांदणे पिणारा पक्षी ८२. काज, कार्य ८४. अफवा ८५. व्यक्तीला अंकित करण्याचा कथित जादूटोणा ८७. वाकडा ८८. बहाणा, खोटे कारण ९०. छोटी कट्यार ९१. शक्ती ९२. कालवा, नहर ९३. वाटोळा ९४. विष्णूचे शयनस्थान ९५. लायकी ९७. वांती १००. खोकल्याची उबळ १०१. पर्वत १०२. मनोहर १०४. धनी, स्वामी १०६. त्वरित १०७. वरी, नाचणी इ. तृणधान्ये १०८. आधी न कळवता, अचानक

**उभे शब्द –**

१. ज्याचा कोणीच पराभव केला नाही असा २. हनुमानाचे शस्त्र ३. गोळीबाराचे शस्त्र ४. जून पोफळी शिजवून वाळवलेली सुपारी ६. संपूर्ण ७. झुकलेला ८. स्त्री ९. राडा, चिखल १०. राख १५. भीतीने सुटलेले कापरे १६. पत्नी, घरधनीण १७. करंजी १८. दोघे १९. मेडल, बिल्ला २०. स्वर्गातून गंगा आणणारा २२. तांब्या २७. शूर स्त्री २९. लग्गा ३२. दृष्टांत ३४. दह्याचे शीतपेय ३७. खडे सैन्य ३९. लुच्चा ४१. शासकीय विश्रामधाम ४२. चार धावांचा फटका ४४. शिवभक्त ४६. ठोंब्या ४९. पेटवणे ५१. दृष्टी ५२. टिंगलखोर ५३. चक्काचूर ५५. दारुडा ५६. सातवे नक्षत्र ५९. हलवता येणारी मालमत्ता ६१. डोंगराचा तुटलेला भाग ६२. वाकडा ६३. कोंदट जागा ६४. देवाला घातलेले साकडे ६५. अस्वीकार ६७. गायीचे पिल्लू ६८. शालीन ६९. वृक्ष, अरण्य ७०. कांचनमृग ७२. पाठीचा कणा ७४. टोपली ७६. फोडणीसाठी तयार केलेला मसाला ७७. छप्पर असलेली गाडी ७८. वक्र ८०. पासपोर्ट ८३. लोकरी गळपट्टा ८४. कटी ८५. राजाचा अमात्य ८६. परिशिष्ट ८९. पुरस्कार ९०. रोडावलेला ९२. पर्ण, पृष्ठ ९५. साडीचा पदर ९६. संकटातून वाचवणारा ९८. मृत ९९. अचानक झालेली इच्छा १००. बांगला देशाची राजधानी १०३. चामखीळ १०४. केशतेलातील एक वनस्पती १०५. कैवार •

**ननवाकाळ कोडे क्रमांक १३३७चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. जागरूकता ४.भाष्यकार ७. निशा ९. धादांत ११. तेग १२. बाग १३. लाजरा १५. मश्रूम १६. रूप १७. नख १९. कामधेनू २०. कनवाळू २२. धूप २५. डझन २८. टीप २९. अमरनाथ ३१. पतकर ३४. फाटक ३६. रमणी ३८. शर ३९. सटरफटर ४१. पारध ४२. कुलटा ४४. धन ४५. जडणघडण ४९. काळिमा ५०. सभ्य ५२. रस ५३. झगा ५४. मऊ ५५. कासव ५७. इशारा ५९. खोटे ६०. गिटार ६१. अज ६३. पायजमा ६५. बखेडा ६७. वाळवंट ६९. मानवता ७१. घावनघाटले ७४. फेपरे ७७. दाटी ७८. पाल ७९. वट ८०. नरमाई ८१. अवजार ८३. धरणे ८४. बोका ८५. काप ८७. रण ८८. पाडवा ८९. कानफट ९१. आचरट ९३. सारंग ९४. नवा ९५. चेला ९६. हतप्रभ ९८. अवगत ९९. खुरपे १००. शह १०१. रवा १०२. विपरीत १०३. गाजावाजा १०४. पद १०६. ठाणवई १०७. मयत १०८. तणाव

**उभे शब्द** : १. जाते २. गगन ३. कर्णा ४. भागधेय ५. काला ६. रजक ८. शामळू ९. धामधूम १०. तरू १२. बाम १४. रानटी १८. खडक १९. कान २१. वापर २३. परचुरण २४. अपशकुनी २६. झरणी २७. फटफटी २९. अणी ३०. थडी ३२. तरंत ३३. बासन ३४. फार ३५. कट ३७. मचाण ४०. रज ४१. पाडस ४३. टाकाऊ ४४. धमाका ४६. डच्चू ४७. घरटे ४८. अंगार ५०. सवय ५१. दशा ५३. झटापट ५४. मज ५६. सपाट ५७. इमानदार ५८. राबता ५९. खोडा घालणे ६१. अहिफेम ६२. घोळ ६४. जमा ६६. अनवधान ६७. वारेमाप ६८. वंद्य ७०. वटी ७२. घाट ७३. लेखिका ७५. परका ७६. हावरट ७८. पारवा ८२. जाण ८३. धडगत ८४. बोटचेपेपणा ८६. नीच ८८. पारंगत ८९. कावा ९०. दहशत ९१. आभरण ९२. रट्टा ९३. सावरी ९४. नवजात ९७. तह ९८. अपरा ९९. खुजा १०३. गाय १०५. दव




**रविवार १० ऑगस्ट २०२५ ते शनिवार १६ ऑगस्ट २०२५**

**- ज्योतिषपंडित प्रज्ञा धनंजय, पुणे.**

## मेष

**सर्वसाधारणपणे** आठवडा लाभदायक आहे. कार्याची गती कमी वाटली तरी नियम जिद्दीने काम पूर्ण करा; त्याचे फलित नक्की मिळणार आहे. कर्माला भाग्याची साथ आहे. सर्वांचे मत ऐकून घेतले तरीही अंतिम निर्णय तुमचा राहू द्या. भावनेच्या भरात निर्णय नको. स्पर्धकांशी लढण्यात ताकद वाया घालू नका. वाटाघाटी करताना योग्य शब्दांचा वापर महत्त्वाचा. आर्थिक आवक चांगली असली तरीही खर्च नियंत्रणात ठेवावा लागेल. काम व घराकडे लक्ष देताना तारांबळ उडेल. कौटुंबिक प्रश्न जोडीदाराच्या सहकार्याने मार्गी लावू शकाल. संततीबाबत थोडी चिंता वाटेल. सुसंवादांनी गोष्टी सोप्या होतील. आईच्या आरोग्याची काळजी घ्या.

नोकरदार व व्यावसायिकांनी नवीन संधीचा जरूर लाभ घ्यावा. मात्र वाटाघाटी करण्याआधी कायदेशीर बाबी तपासून पहाव्यात. मतभेद झाले तरी वादविवाद टाळावा. कोर्टकचेरी, सरकारी व सामाजिक क्षेत्र, मास मीडिया, जाहिरात, व्यवस्थापन, शिक्षणक्षेत्र, पोलीस व सैन्यदल, संशोधन क्षेत्राशी संबंधित व्यक्तींना यशदायक कालावधी.

**शुभ दिनांक** : १०, ११, १२, १५.

## वृषभ

**आठवड्याच्या** सुरुवातीला महत्त्वाची कामे करून घ्या. आर्थिक लाभ चांगले होतील. तुमचे अंदाज बरोबर ठरतील. फक्त कुठलेही व्यवहार भावनेच्या भरात करू नका. स्वतःवर विश्वास ठेवा. दुसऱ्यांवर फार अवलंबून राहता येणार नाही. जबाबदारी वाढणार आहे. कागदपत्रांची काळजी घ्या. बोलताना योग्य शब्द वापरा म्हणजे गैरसमज होणार नाहीत. कामाची जबाबदारी वाढल्यामुळे घराकडे दुर्लक्ष होऊ शकते. जोडीदार कामांमध्ये व्यस्त राहील. मुलांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी आर्थिक नियोजन करा. कुटुंबाच्या प्रगतीसाठी अलिप्त धोरण स्वीकारून कठोर निर्णय घ्यावे लागतील. वडिलोपार्जित स्थावर, संपत्ती संबंधित प्रश्न सोडवले जाऊ शकतात.

नोकरदार व व्यावसायिकांना सकारात्मक दृष्टिकोन व आत्मविश्वास उपयोगी पडेल. अधिकाराचा योग्य तोच वापर करा. कामाचे अडकलेले पैसे मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू करा. तंत्रज्ञ, सामाजिक व आर्थिक क्षेत्र, पोलीस व सैन्य दल, चिकित्सक, समीक्षक, वैद्यकीय व्यवसाय, व्यवस्थापन व जाहिरात क्षेत्र या संबंधित व्यक्तींना यश मिळेल.

**शुभ दिनांक** : १०, ११ ,१२, १४.

## मिथुन

**आठवड्याच्या** सुरुवातीला कामाचे नियोजन करा. उत्तरार्ध प्रत्यक्षात कामाला यशदायी आहे. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. निर्णय घेण्यात द्विधा मनस्थितीमुळे उशीर होत असेल तर अनुभवी लोकांचा सल्ला घ्या. स्वतःचाही अनुभव विचारात घ्या. आर्थिक स्थिती सुधारणार आहे. मुद्देसूद पण योग्य शब्दात बोला. कष्टामध्ये कमी पडू नका. चैनीकडे कल राहील. घरामधील वातावरण थोडेसे तप्त, उदास राहील. वाद टाळा. कामामुळे धावपळ वाढणार आहे. सगळ्या आघाड्यांकडे लक्ष द्यावे लागेल. जोडीदाराची साथ नक्की मिळेल. संततीसंबंधी चांगली घटना घडेल. नवीन नात्याची सुरुवात होऊ शकेल.

नोकरदारांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील एखादा नवीन कोर्स केल्यास फायदा होईल. वरिष्ठांचे मर्यादित सहकार्य राहील. व्यावसायिकांना कामाची गती कमी झाल्यासारखी वाटली तरी अडथळ्यांवर मात करत कार्य पूर्ण करा. नवीन व्यवहार करताना कागदपत्रांची शहानिशा करावी. राजकारण, समाजकारण, व्यवस्थापन, आर्थिक क्षेत्र, घरगुती व्यवसाय, खाद्यपदार्थ, वकील, आयटी क्षेत्र यांच्यासाठी योग्य काळ आहे.

**शुभ दिनांक** : १२, १४, १५.

## कर्क

**आठवड्याच्या** सुरुवातीला थोडे अडथळे येतील. उत्तरार्धात प्रयत्नांना यश मिळून अधिकारात वाढ झालेली दिसेल. लग्नातील बुधादित्य योग तुमचा आत्मविश्वास वाढवेल. आर्थिक स्थिती सर्वसाधारणपणे चांगली राहील. लाभाचे प्रमाण व खर्च समप्रमाणात राहतील. तात्पुरत्या फायद्याचा विचार न करता श्रमामध्ये कुठेही कमतरता ठेवू नका. अतिउत्साह न दाखवता धडाडीने व सातत्याने काम करा. व्यावहारिक दृष्टिकोन व भावनाशील वृत्ती यामध्ये गोंधळू नका. घरामध्ये वातावरण चांगले राहील. कामानिमित्त प्रवास करावा लागेल. कोणतीही समस्या असल्यास अलिप्तपणे निर्णय घ्या. घराची विक्री करायची असल्यास चांगला फायदा मिळेल. जोडीदाराशी बोलताना गैरसमज टाळा. जोडीदाराच्या अनुभवाचा फायदा होईल. संततीच्या दृष्टीने चांगला काळ आहे.

नोकरदार व व्यावसायिकांनी गुंतवणूक करताना विशेष काळजी घ्यावी. आधीची वसुली करताना त्रास होईल. नवीन संधीचा लाभ घेण्यापूर्वी व्यावसायिकांनी पूर्ण माहिती गोळा करूनच निर्णय घ्यावा. नोकरवर्गाशी मतभेद संभवतात. आर्थिक क्षेत्र, खेळाडू, कलाकार, व्यवस्थापन, सरकारी व सामाजिक क्षेत्र, मास मीडिया, जाहिरात, अभिनय, मेकअप आर्टिस्ट यांच्यासाठी चांगला काळ आहे.

**शुभ दिनांक** : १४, १५.

## सिंह

**आठवड्याच्या** प्रारंभी महत्त्वाची कामे करून घ्या, नंतर परिश्रम वाढतील. स्वतःच्या क्षमतेबद्दल अविश्वास दाखवू नका. एखाद्या गोष्टीच्या मुळाशी जाऊन निर्णय घ्याल व तो तुम्हाला फायद्याचा ठरेल. आर्थिक आवक चांगली राहील. खर्चावर मात्र नियंत्रण ठेवा. मनातील इच्छा पूर्ण कराल. नवीन अभ्यासक्रम केल्यास त्यातून फायदा दिसतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. वडिलोपार्जित संपत्तीचा प्रश्न लांबेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. भावंडांशी जमवून घेतल्यास त्यांचे सहकार्य मिळेल. संतती व मित्रांबरोबर वेळ घालवता येईल. खर्चात वाढ होईल. जोडीदाराची काळजी घ्या.

नोकरदारांनी वरिष्ठांशी वाद होणार नाही याकडे लक्ष द्यावे. सामंजस्याने बरेच प्रश्न मार्गी लागतील. व्यावसायिकांनी व्यवसायातील चढ-उतारासाठी तयार राहावे. मोठी गुंतवणूक पुढे ढकला. अर्थप्राप्तीसाठी पर्यायी मार्गांचाही विचार करून ठेवा. भागीदारीतील व्यवसायात सावधगिरी बाळगावी. संशोधन क्षेत्र, जमिनीचे व्यवहार करणारे, मास मीडिया, परदेशाशी व्यापार, आर्थिक क्षेत्र, सरकारी क्षेत्रातील व्यक्तींसाठी चांगला काळ राहील.

**शुभ दिनांक** : १०, ११, १२, १५.

## कन्या

**आठवड्याच्या** सुरुवातीला तुमच्या मनामध्ये थोडा गोंधळ, आकारण भीती राहील. पण स्पर्धकांवर मात करू शकाल. जशास तसे वागणे योग्य राहील. नियोजनपूर्वक व संयम ठेवून निर्णय घ्या. पुढाकार घेऊन कृतीला प्राधान्य द्या. भावनाशील होणे प्रत्येक वेळी चांगले नसते. स्वतःच्या क्षमतेइतकेच कार्य स्वीकारावे. दुसऱ्यावर अवलंबून राहता येणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील. पूर्वीची येणी वसूल होऊ शकतात. घरगुती, कौटुंबिक व्यवसाय असल्यास यश मिळेल. कुटुंबासमवेत पर्यटनास जाल व आनंदात वेळ घालवा. घरातील ज्येष्ठांची काळजी घ्यावी लागेल. जोडीदाराच्या सहकार्य व सल्ल्यामुळे भाग्योदय होईल. संततीचे प्रश्न तुमच्या मदतीने मार्गी लागतील.

नोकरदारांना व व्यावसायिकांनी स्पर्धक, हितशत्रूंच्या वाढत्या गुप्त कारवायांपासून सावध राहावे. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. व्यावसायिकांनी नियोजनपूर्वक नवीन क्षेत्रात पाऊल ठेवण्यास हरकत नाही. घरगुती व्यवसाय, सामाजिक व धार्मिक क्षेत्र, मास मीडिया, क्रिएटिव्ह क्षेत्र, बौद्धिक क्षेत्र, आयटी, संशोधन क्षेत्र या संबंधित व्यक्तींना शुभ काळ आहे.

**शुभ दिनांक** : १०, ११, १२, १४.

## तूळ

**प्रगती** व इच्छित कामे होण्यासाठी सर्व योग शुभ आहेत. आठवड्याची सुरुवात गोंधळात टाकणारी राहील. तेव्हा मन स्थिर ठेवून निर्णय घ्या. आठवड्याचा उत्तरार्ध यश देणार आहे. आर्थिक आवक चांगली राहील. परंतु खर्चावर नियंत्रण गरजेचे राहील. नवीन व्यवहार करताना, कागदपत्रांवर सही करताना विशेष काळजी घ्या. गृहसौख्य सर्वसाधारण राहील. कामाच्या व्यापामुळे घराकडे दुर्लक्ष होऊ शकते. कौटुंबिक समस्या योग्य प्रकारे मार्गी लावू शकाल. तुमच्या कार्यशैलीचे कौतुक होईल. जोडीदार व संततीशी सुसंवाद ठेवा. घरातील ज्येष्ठांचा सल्ला उपयोगी पडेल.

नोकरदार, व्यावसायिकांनी नवीन संकल्पना राबवण्याची संधी सोडू नये. एखाद्या गोष्टीचा आधी केलेला अभ्यास, संशोधन आता तुम्हाला वापरता येईल. व्यावहारिक दृष्टिकोन विसरू नका. व्यावसायिकांना नोकरवर्गाचे सहकार्य मिळेल. उत्साह, धडाडी कायम ठेवा. आर्थिक नियोजन विचारपूर्वक करा. सेवा क्षेत्र, व्यवस्थापन, रियल इस्टेट, मास मीडिया, आयटी क्षेत्र, कायदा व सामाजिक क्षेत्र, कला क्षेत्राशी संबंधित व्यक्तींसाठी चांगला काळ आहे.

**शुभ दिनांक** : १२, १४, १५.

## वृश्चिक

**आठवड्याचा** उत्तरार्ध चांगला आहे. अकारण भीती बाळगू नका. चिकाटी व धैर्याने काम पूर्ण करा. आपली वेळ येईपर्यंत मनातील संकल्पना, निर्णय उघड करू नका. भावनेच्या भरात कुठलेही निर्णय घेऊ नका. बोलणे, खाणे व खर्चावर नियंत्रण ठेवा. वाद टाळा. स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करणे उपयुक्त ठरेल. कुटुंबामध्ये गैरसमज टाळा. संतती व जोडीदारासाठी अनपेक्षित खर्चाची तयारी ठेवा. कार्यक्षेत्र व कुटुंब दोन्हीकडे वेळ देताना तारांबळ होईल. मित्रांकडून सहाय्य मिळेल.

नोकरदारांनी कामामध्ये लक्ष केंद्रित करावे. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. स्पर्धकांवर मात करू शकाल. व्यावसायिकांना केलेल्या कामाचे फळ मिळेल. कामामध्ये सातत्य, नियोजन गरजेचे आहे. कार्यक्षेत्रात बदलाचे स्वागत करा. आत्मविश्वास कायम राखा. भांडवल उभे करण्यासाठी अडचणी आल्या तरी शेवटी मार्ग निघेल. तज्ज्ञांचा सल्ला उपयोगी पडेल. आर्थिक क्षेत्र, कलाकार, व्यवस्थापन, खाद्यपदार्थ, जाहिरात क्षेत्र, खेळाडू, सल्लागार, वैद्यकीय क्षेत्रासाठी चांगला काळ आहे.

**शुभ दिनांक** : १०, १२, १५.

## धनु

**आठवड्याचा** प्रारंभ चांगला असेल. नंतर मात्र विरोधी हालचाली वाढतील. स्वतःच्या क्षमतेबद्दल शंका निर्माण होतील. आळस वाढू शकतो. या सगळ्यावर मात करून धैर्याने निर्णय घ्या. प्रत्येक ठिकाणी स्वतः लक्ष घाला. सध्या दुसऱ्यावर अवलंबून राहणे योग्य ठरणार नाही. आर्थिक आवक चांगली असेल तरी अचानक खर्च निघू शकतात. आर्थिक गुंतवणूक दीर्घकालीन करा. घरामध्ये थोडे उदास वातावरण असेल. ज्येष्ठांची काळजी घ्या. वाद टाळा. धार्मिक गोष्टींकडे ओढा राहील. नातेवाईक जमवून आनंदात वेळ घालवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. भावंडांशी जमवून घ्यावे लागेल. जोडीदाराच्या मताचा जरूर विचार करा. अविवाहितांनी विवाह जमवण्यासाठी प्रयत्न चालू करावेत.

नोकरदारांनी सहकारी व वरिष्ठांशी सुसंवाद ठेवावा. व्यावसायिकांनी खर्चाचा योग्य अंदाज घेऊनच आर्थिक उलाढाल करावी. धाडसी निर्णय व्यावहारिक पातळीवर तपासून पाहा. पोलीस व सैन्य दल, राजकारण, बौद्धिक क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, आयटी, वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित व्यक्तींसाठी योग्य काळ आहे.

**शुभ दिनांक** : १०, ११, १२.

## मकर

**आत्मविश्वास** व मानसिक दृढता कायम ठेवा. त्यामुळे अनेक गोष्टी पूर्णत्वाला नेऊ शकाल. कुठलाही निर्णय भावनेच्या भरात घेऊ नका. आठवड्याच्या मध्यावर नवीन संधी, नवीन व्यवहाराचा योग आहे. वाटाघाटी करताना योग्य शब्द वापरा. कागदपत्रांवर सही करताना काळजी घ्या. आर्थिक धोरण तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय ठरवू नका. आवक सर्वसाधारणपणे चांगली राहील. घरामध्ये तप्त वातावरण राहू शकते. बोलण्यामुळे गैरसमज होऊ शकतात. जोडीदाराशी वागता-बोलताना अहंकार टाळा. संततीशी सामंजस्य राखावे लागेल. अतिरिक्त खर्चाची तरतूद करा.

नोकरदारांनी सहकाऱ्यांशी वागताना सौजन्य दाखवणे योग्य ठरेल. नोकरदार व व्यावसायिकांनी चूक होणार नाही याची सावधगिरी बाळगावी. कार्यक्षेत्रातील स्पर्धा वाढणार आहे. पर्यायी योजना, जिद्द, तत्परता व संयम यामुळेच पुढे जाऊ शकाल. व्यापार, संशोधन, कमिशन एजंट, व्यवस्थापन, वैद्यकीय व्यवसाय, सल्लागार, आर्थिक, कलाकार, खाद्यपदार्थ या संबंधित क्षेत्रातील व्यक्तींसाठी चांगला काळ आहे.

**शुभ दिनांक** : १२, १४

## कुंभ

**आठवडा** चांगला जाईल. योजलेल्या कामांमध्ये यश मिळेल. मनातील चंचलता, भयावर नियंत्रण ठेवा. कुठल्याही गोष्टीच्या मुळाशी जाऊन पूर्ण माहिती करून घेणे हा तुमचा स्थायीभाव खूपच उपयोगी पडेल. सध्या केलेल्या कामाचे पैसे मिळवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील, पण त्यात यश मिळेल. आठवड्याच्या उत्तरार्धात नवीन संधी मिळेल. लोकांशी सुसंवाद उपयोगी पडेल. कुटुंबाची जबाबदारी वाढली तरी तुम्ही व्यवस्थित पार पाडाल. फार भावनाशील होऊन चालणार नाही. वास्तुच्या माध्यमातून फायदा होईल. भावंडांशी मतभेद होऊ शकतील. संतती व जोडीदाराबद्दल काळजी वाटेल, पण नात्यांमध्ये सुधारणा होईल.

नोकरदारांनी हितशत्रूंचे डावपेच ओळखून आपले निर्णय घ्यावेत. वरिष्ठांचे सहकार्य गृहीत धरू नये. व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागला तरीही ठरवलेल्या योजना पूर्ण होतील. कार्यक्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग होईल. घरगुती व्यवसाय, खाद्यपदार्थ, आर्थिक क्षेत्र, तंत्रज्ञ, संशोधन, कॉस्मेटिक्स, सामाजिक क्षेत्र, पोलीस व सैन्य दल, वकील या संबंधित कार्यक्षेत्रात यश मिळू शकेल.

**शुभ दिनांक** : १०, ११, १२, १५

## मीन

**आठवड्यात** प्रारंभी नियोजित कार्यात अडथळे आले तरीही पुन्हा प्रयत्न करून, नियम पाळून काम पूर्ण करा. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. आर्थिक आवक व जावक समप्रमाणात राहील. बचतीचा मार्ग स्वीकारा. काही चुका झाल्या तरीही त्या वेळीच उपाय करून सावरल्या जातील. घरामध्ये धार्मिक, उत्साहाचे व आनंदी वातावरण राहील. संततीसाठी अनपेक्षित खर्चाची तरतूद करून ठेवा. कामासाठी अचानक प्रवास करावा लागला तरी कुटुंबासाठी योग्य तो वेळ काढा. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. तात्विक मतभेद होऊ शकतात. भावंडे व मित्रांशी गैरसमज होणार नाही याची काळजी घ्या.

नोकरदारांना गुप्त कारवायांना तोंड द्यावे लागेल. नवीन नोकरी शोधत असाल तर त्याबाबतीत हालचाल होईल. व्यावसायिकांसाठी भावनाशील होऊन अचानक निर्णय घेणे त्रासाचे ठरेल. आठवड्याच्या उत्तरार्धात आर्थिक गुंतवणूक टाळा. बौद्धिक क्षेत्र, घरगुती व्यवसाय, इंटिरियर डेकोरेटर, व्यवस्थापन, सेवा व सामाजिक क्षेत्र, कायदा, तंत्रज्ञान, आयटी, पर्यटन यासंबंधी क्षेत्रातील लोकांसाठी चांगला काळ आहे.

**शुभ दिनांक** : १२, १३, १५.

✱✱✱

# नवाकाळ

• पुणे । रविवार १० ऑगस्ट, २०२५ • पान -८


## एकनाथ शिंदे आज जम्मू-काश्मीर दौऱ्यावर



**मुंबई** - ऑपरेशन सिंदूरनंतर शिवसेना शिंदे गटाकडून श्रीनगरमध्ये महा सिंदूर महारक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. या निमित्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर जाणार आहेत. ते श्रीनगर येथे दाखल होऊन आर्मी कमांड रुग्णालयाला भेट देतील. ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सांगली जिल्ह्यातील १,००० कुस्तीपटू रक्तदान करणार आहेत. त्यांचे नेतृत्व शिंदे गटाचे नेते व डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील करत आहेत. शिबिरासाठी श्रीनगरमध्ये ठिकठिकाणी बॅनर लावण्यात आले आहेत. पहेलगाम हल्ल्यानंतर शिंदे यांचा हा तिसरा जम्मू-काश्मीर दौरा आहे. तयारीसाठी शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत आज जम्मूत दाखल झाले असून त्यांनी उद्या होणाऱ्या सभेच्या तयारीचा आढावा घेतला.

## मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात परदेशी प्राण्यांची तस्करी

■ मुंबई



**मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळावरून परदेशी प्राण्यांच्या तस्करीचा आणखी एक प्रकार उघडकीस आला आहे. बँकॉकवरून मुंबईला आलेल्या या शाहरुख खान मोहम्मद हसीअन याने बॅगेतून दुर्मीळ प्राण्यांची अवैध तस्करी करायचा प्रयत्न केला. त्याच्याकडे मोठ्या प्रमाणावर परदेशी प्राणी जप्त करण्यात आले.

यात अल्बिनो रेड-ईयर्ड स्लायडर जातीची तब्बल ५० कासवे, सेब्युएला प्रजातीची २ पिग्मी मर्मोसेट माकडे आणि २ किंगकाजू जप्त करण्यात आले. हे सर्व प्राणी दुर्मीळ विदेशी प्रजातींचे असून त्यांची वाहतूक आणि व्यापार बेकायदेशीर आहे. या प्रकरणी शाहरुख खान हसीअनला वन्यजीव संरक्षण अधिनियम तसेच कस्टम कायद्यांतर्गत अटक करण्यात आली आहे.

## नागपूर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा आज शुभारंभ

■ नागपूर



**नवीन** नागपूर (अजनी) ते पुणे वंदे भारत एक्स्प्रेसचा शुभारंभ उद्या सकाळी ९ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. याच कार्यक्रमात बंगळुरू-बेळगाव आणि श्री माता वैष्णोदेवी कटरा-अमृतसर वंदे भारत एक्स्प्रेस सेवांचाही प्रारंभ होईल.

नागपूर रेल्वे स्थानकावरून सुटणारी ही तिसरी वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेन असेल. सध्या नागपूर-बिलासपूर आणि नागपूर-सिकंदराबाद या दोन वंदे भारत एक्स्प्रेस सेवा सुरू आहेत. नवीन नागपूर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस ही सेमी-हायस्पीड एसी चेअर कार सेवा असणार आहे. ही गाडी अजनी (नागपूर) येथून सकाळी ९.५० वाजता सुटेल आणि रात्री ९.५० वाजता पुण्याला पोहोचेल. आठवड्यातून सहा दिवस ही सेवा सुरू राहील. सोमवारी ती नागपूरहून चालणार नाही. पुण्याहून ही ट्रेन सकाळी ६.२५ वाजता सुटून, संध्याकाळी ६.२५ वाजता अजनीला पोहोचेल. ती वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, भुसावळ, जळगाव, मनमाड, कोपरगाव, अहमदनगर, दौंड या रेल्वे स्थानकांवर थांबेल. या गाडीच्या एसी चेअर कारचे भाडे सुमारे १,५०० रुपये तर एसी एक्झिक्युटिव्ह चेअर कारचे भाडे ३,५०० रुपये असणार आहे. उद्या उद्घाटनानंतर १४ ऑगस्टपासून वंदे भारत एक्स्प्रेसची नियमित सेवा सुरू होईल.

## ऑपरेशन सिंदूरवर आधारित राखी साईबाबांना अर्पण

■ अहिल्यानगर



**छत्तीसगडच्या** भाविकाने रक्षाबंधननिमित्त आज शिर्डीच्या साईबाबांच्या मूर्तीला ऑपरेशन सिंदूरवर आधारित ३५ किलो वजनाची राखी अर्पण केली. साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आणि त्यांच्या पत्नी वंदना गाडीलकर यांनी पूजन करून ही राखी श्रींना अर्पण केली. छत्तीसगडमधील बिलासपूर येथील या साईभक्त परिवाराने ३५ किलो वजनाची, ३६ फूट लांब व ५ फूट रुंद अशी भव्य राखी साईबाबांच्या चरणी अर्पण केली. ही राखी कलाकार दिलीप दिवाकर पात्रीकर यांनी १० दिवसांत तयार केली. या राखीवर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साय, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तिन्ही सेना प्रमुख तसेच ऑपरेशन सिंदूरबाबत पत्रकार परिषदेत माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि ऑपरेशनदरम्यान सैनिकांची काळजी घेणारे श्रवण सिंग यांचे फोटो लावण्यात आले आहेत.

## नीरव मोदीचा मेहुणा कबुलीजबाब देणार

■ मुंबई

**पंजाब** नॅशनल बँकेत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा करून देशाबाहेर पळून जाणाऱ्या नीरव मोदीच्या विरोधात त्याचा बहिणीचा पती मयांक मोदी कबुलीजबाब देणार आहे. तोही या बँक घोटाळ्यातील एक आरोपी असून, त्यांनी लेटर ऑफ अंडरस्टँडिंगद्वारे २३ हजार ७८० कोटी रुपयांची रक्कम बेकायदेशीर पद्धतीने वळवून आर्थिक फसवणूक केली होती.

मयांक मोदी याने या साऱ्या प्रकाराबाबत कबुलीजबाब देण्याची तयारी असल्याची याचिका सीबीआयने दाखल केली होती. विशेष न्यायाधीश अजय विठ्ठल गुजराथी यांनी त्याला मान्यता दिली असून, सीबीआय न्यायालयात मेहता यांचा हा



जबाब नोंदवणार आहे. मेहताच्या वकिलानेही याला दुजोरा दिला आहे. न्यायालयाने यासंदर्भात मेहताला ११ ऑगस्टला हजर राहायला सांगितले आहे.

ईडीने मयांक मेहता याचे नाव याआधीच आरोपींच्या यादीत टाकले आहे. दरम्यान सीबीआयने गेल्या महिन्यात दाखल केलेल्या पुरवणी आरोपपत्रातही त्याच्यासह इतरांची नावे समाविष्ट करण्यात आली.

यामध्ये नीरव मोदीची बहीण व मयांक मेहताची पत्नी पूर्वी हिच्यासह आदित्य नानावटी यांचेही नाव आहे. या आरोपपत्रात लेटर ऑफ अडरस्टँडिंगद्वारे विविध खात्यांमधून मेहताच्या खात्यात पैसे वळवण्यात आल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर पूर्वीच्या खात्यातही १० हप्त्यांत पैसे वळवण्यात आले होते. हे पैसे पूर्वीने तिच्या पतीकडून मिळालेली भेट असल्याचे दाखवले होते.

## कॅनडात खलिस्तानवाद्यांनी स्वतंत्र दुतावास सुरू केला

■ टोरँटो

**कॅनडामधून** सुत्रे हलवणाऱ्या खलिस्तानवाद्यांनी आता खलिस्तान प्रजासत्ताक नावाने आपला स्वतंत्र दुतावास सुरू केला आहे. ब्रिटिश कोलंबिया राज्यातील सुरे प्रांतात गुरु नानक शीख गुरुद्वारामधून हा दुतावास चालविला जात आहे. भारताने दहशतवादी घोषित केलेल्या हरदीप सिंग निज्जर याच गुरुद्वारामधून भारतविरोधी कारस्थाने करत होता. त्याच्या हत्येपासून भारत आणि कॅनडामधील राजकीय संबंध ताणले गेले होते. या अनधिकृत खलिस्तानी दुतावासाबद्दल कॅनडाच्या सरकारने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका मांडलेली नसली तरी कॅनडातील भारतीय उच्चायुक्तालयाने निवेदन जारी करून या कृत्याचा निषेध केला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण करणारे हे कृत्य आहे, अशा शब्दांत भारताने या कृत्याचा निषेध केला आहे. त्याचबरोबर कॅनडा सरकारने याबाबत भूमिका स्पष्ट करावी, असे उच्चायुक्तालयाने म्हटले आहे.

## एल्गार परिषद प्रकरणातील आरोपी ॲड. गडलिंगांची याचिका प्रलंबित

■ नवी दिल्ली

**एल्गार** परिषद प्रकरणी माओवाद्यांशी कथित संबंधांच्या आरोपावरून अटक करण्यात आलेल्या ॲड. सुरेंद्र गडलिंग यांच्या जामीन याचिकेवरील सुनावणीला विलंब होत असल्याचे मान्य करत सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या याचिकेवर लवकरच सुनावणी घेऊ, अशी ग्वाही दिली.

सरन्यायाधीश भूषण गवई, न्या. के. विनोद चंद्रन आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर ॲड. सुरेंद्र गडलिंग यांच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी गडलिंग यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. आनंद ग्रोव्हर यांनी बाजू मांडली. गडलिंग यांच्या जामीन अर्जावर सुनावणी तब्बल ११ वेळा पुढे ढकलण्यात आली असून, या चालढकलीमुळे ते मागील साडेसहा वर्षे तुरुंगात आहेत, असे ॲड. ग्रोव्हर यांनी न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने विलंब झाल्याचे मान्य करून गडलिंग यांच्या जामिनावर लवकरच सुनावणी घेऊ, असे सांगितले.

३१ डिसेंबर २०१७ रोजी पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या एल्गार परिषदेत शासन व्यवस्थेविरोधात चिथावणीखोर भाषणे दिल्याचा आरोप आहे. दुसऱ्या दिवशी कोरेगाव-भीमा येथील युध्द स्मारकाजवळ यामुळे हिंसाचार झाला, असा पोलिसांचा आरोप आहे.

## महादेवीसाठी सोमवारी पुनर्विचार याचिका दाखल केली जाणार

■ मुंबई

**महादेवी** हत्तीण पुन्हा नांदणी मठात आणण्यासाठी राज्य सरकार, वनतारा आणि नांदणी येथील स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठ यांच्यातर्फे संयुक्तपणे सोमवार ११ ऑगस्टला सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने नांदणी मठाची याचिका फेटाळल्यानंतर महादेवी हत्तीणीची पाठवणी वनताराकडे करण्यात आली. त्यानंतर हत्तीण पुन्हा नांदणी मठात यावी, या मागणीसाठी कोल्हापुरात आंदोलन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य शासनाकडून सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात येईल, असे आश्वासन दिले. नांदणी मठ आणि राज्य सरकारने उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यासाठी विनंती अर्जाचा प्राथमिक मसुदा गुरुवारी तयार केला. त्यानंतर काल मुंबईत नांदणी मठ, राज्य सरकार आणि वनताराची संयुक्त बैठक झाली. या बैठकीत सोमवारी याचिका दाखल करण्याचा निर्णय अधिकृतपणे घेण्यात आला.

## ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त प्रदेश काँग्रेसची पदयात्रा

■ मुंबई

**आज** ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त प्रदेश काँग्रेसच्या वतीने गिरगाव चौपाटी ते ऑगस्ट क्रांती मैदान पदयात्रा काढण्यात आली. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह महात्मा गांधी यांचे पणतु तुषार गांधी आणि विविध सामाजिक संघटना या पदयात्रेमध्ये सहभागी झाल्या होत्या. गिरगाव चौपाटी येथील लोकमान्य टिळक स्मारकाला अभिवादन करून या पदयात्रेची सरुवात झाली. हातात संविधानाची प्रत आणि तिरंगा ध्वज घेऊन शांततेत आणि शिस्तबध्दपणे ही पदयात्रा ऑगस्ट क्रांती मैदानावर पोहोचली. तिथे १९४२ च्या चले जाव चळवळीतील क्रांतीवीरांना अभिवादन करून पदयात्रा मणिभवनच्या दिशेने रवाना झाली.



आणिक बेस्ट डेपोत बेस्ट उपक्रमाचे प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनात जुन्या बस, तिकीट, बस थांबे, बस डेपोंचा देखावा साकारण्यात आला. (छाया : दीपक साळवी)

## दिल्लीत जुन्या मंदिराची भिंत कोसळली! ८ ठार

■ नवी दिल्ली

**दिल्लीच्या** दक्षिण-पूर्व भागातील जैतपूर येथील हरी नगर परिसरात आज एका जुन्या मंदिराची भिंत कोसळून ८ जणांचा मृत्यू झाला. शबीबुल (३०), रबीबुल (३०), मुत्तू अली (४५), रुबिना (२५), डॉली (२५), रुखसाना (६), हसीना (७) आणि हाशिबुल अशी त्यांची नावे आहेत. दिल्लीचे अतिरिक्त पोलीस उपायुक्त ऐश्वर्या शर्मा यांनी सांगितले की, ही घटना एका जुन्या मंदिराजवळ घडली. या ठिकाणी अनेक भंगारविक्रेते शेजारील झोपड्यांमध्ये राहतात. मुसळधार पावसामुळे भिंत अचानक कोसळल्याने आठ जण ढिगाऱ्याखाली अडकले. सर्वांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## अझरबैजान-अर्मेनिया युद्ध संपले दोन्ही देशांमध्ये शांतता करार

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची मध्यस्थी**

■ वॉशिंग्टन

**अझरबैजान** आणि अर्मेनिया यांच्यामध्ये काल शुक्रवारी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत एक शांतता करार करण्यात आला. अमेरिकेच्या मध्यस्थीने झालेल्या या शांतता करारावर दोन्ही देशांच्या नेत्यांनी स्वाक्षरी केली. या करारामुळे आता दोन्ही देशांमधील ३७ वर्षांचे युद्ध समाप्त होऊन द्विपक्षीय आर्थिक संबंध दृढ होतील.

अझरबैजानचे अध्यक्ष इल्हम अलीयेव आणि अर्मेनियन पंतप्रधान निकोल पशिन्यान यांच्या स्वाक्षऱ्या झालेल्या या कराराद्वारे वादग्रस्त जागेवर




ट्रांझिट कॉरिडॉर बांधला जाणार आहे. या कॉरिडॉरला आंतरराष्ट्रीय शांतता आणि समृद्धीसाठी ट्रम्प रूट असे नाव दिले जाणार आहे. हा कॉरिडॉर अझरबैजानला परदेशाशी जोडेल, जो अर्मेनियातून जातो. व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या स्वाक्षरी समारंभात ट्रम्प म्हणाले की, दोन्ही बराच काळ म्हणजे सुमारे ३५ वर्षांपासून लढत आहेत. आता ते मित्र आहेत आणि ते दीर्घकाळ मित्र राहतील.

यावेळी दोन्ही देशांच्या नेत्यांनी ट्रम्प यांना नोबेल शांतता पुरस्कार दिला जावा अशी इच्छा व्यक्त केली. ट्रम्प यांनी आतापर्यंत ६ युद्धे संपवल्याचा दावा केला आहे. अझरबैजान आणि अर्मेनियामधील हा करार यशस्वी झाला, तर ट्रम्प प्रशासनासाठी ही एक महत्त्वाची कामगिरी असेल.

## वाल्मिक कराडच्या गँगकडून पांगरीत राजेशला मारहाण

■ बीड



**बीडच्या** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड कारागृहात असला तरी कराडच्या गँगची दहशत कमी झालेली नाही. कराडच्या विरोधात पोस्ट टाकल्याने पांघरी येथील तरुण राजेश नेहरकर याला कराडच्या समर्थकांनी धमकावून हात जोडून माफी मागायला लावली आणि त्याचा व्हिडिओ बनवून व्हायरल केला.

कराडच्या विरोधात पोस्ट केल्यामुळे समर्थकांनी प्रथम राजेशला मारहाण केली. इतकेच नाही, तर त्याच्या घरावर हल्ला करून त्याच्या पत्नीलाही मारहाण केली. त्यानंतर राजेशने या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली. परंतु पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. त्यानंतर कराडच्या समर्थकांनी पुन्हा मारहाण करून त्याच्याकडून हात जोडून माफी मागण्याचा व्हिडिओ तयार केला. त्या व्हिडिओत राजेश असे म्हणताना दिसतो की, पांगरी ग्रामपंचायत ग्रुपवर काहीही पोस्ट करणार नाही. वाल्मिक अण्णाच्या विरोधात कुठलीही पोस्ट करणार नाही. अण्णाशिवाय पर्याय नाही. माझी झाली ती चूक झाली.

## लाडक्या बहिणीचा निधी वाढवणार मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेच्या रकमेत अद्याप वाढ झालेली नाही. निवडणुकीदरम्यान काही नेत्यांनी या रकमेत वाढ करण्याची आश्वासने दिली होती. पण जवळपास वर्ष उलटूनही रकमेत वाढ झाली नाही. अशातच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेच्या रकमेत योग्य वेळी वाढ करणार अशी घोषणा केली आहे. रक्षाबंधनानिमित्त मुलुंडमध्ये आयोजित लाडक्या बहिणींचा देवाभाऊ या कार्यक्रमात बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आम्ही लाडक्या बहिणींसाठी चांगले प्रयत्न करत असताना काही सावत्र भाऊ त्यात आडकाठी आणण्याचा प्रयत्न करत आहेत. योजनेविरोधात ते न्यायालयात गेले, पण काही साध्य झाले नाही. म्हणून योजनेत भ्रष्टाचार झाला असा आरोप केला. योजनेतला निधी सरकारच्या खात्यातून थेट लाभार्थी बहिणींच्या खात्यात जातो. त्यामुळे भ्रष्टाचाराचा प्रश्नच नाही. भ्रष्टाचार त्यांच्या डोक्यात आहे. प्रामाणिक लाभार्थी भगिनींना आम्ही हा लाभ देत राहणार आहोत.

## पतीवर भ्रष्टाचाराचे आरोप अधिकारी रश्मी करंदीकर वादात

■ मुंबई

**आयपीएस** अधिकारी रश्मी करंदीकर या वादाच्या भोवऱ्यात सापडल्या असून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाईचे संकेत मिळत आहेत. त्यांच्या एका खात्यात २ कोटी ६४ लाख रुपये आढळल्याने हा वाद निर्माण झाला आहे. हे खाते आपल्या पतीचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या पतीवर दोन आर्थिक गुन्हे नोंदवले आहेत. पतीवरील भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे करंदीकर वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. रश्मी करंदीकर यांच्या ज्या खात्यात रक्कम आढळली ते खाते पती पुरुषोत्तम चव्हाण हे एकट्याने हाताळत असतात, असे रश्मी करंदीकर यांनी सांगितले. चव्हाण यांच्यावर दोन आर्थिक गुन्हे दाखल आहेत. सरकारी जमीन मिळवून देतो असे सांगून त्यांनी सहा जणांची ७.४२ कोटी रुपयांची फसवणूक केली. त्याचबरोबर २०१४ ते २०१९ दरम्यान त्यांनी सरकारी फ्लॅट देतो, पोलीस अकादमीमध्ये टीशर्ट व हुडी पुरवण्याचे कंत्राट मिळवून देतो, सरकारी नोकरी मिळवून देतो अशी खोटी आश्वासने देऊन अनेकांची फसवणूक केल्यामुळे त्यांच्या विरोधात आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हे नोंदवले आहेत. या साऱ्या प्रकरणामुळे आता भ्रष्टाचार निर्मूलन दल रश्मी करंदीकर यांची चौकशी करणार असल्याचे म्हटले.

## उत्तराखंडात ढगफुटीमुळे तलाव आधुनिक तंत्राने बचावकार्य

**महाराष्ट्राचे पर्यटक सुखरूप परतले**

■ डेहराडून

**उत्तराखंडमध्ये** झालेल्या भीषण ढगफुटीनंतर येथील हर्षिलमध्ये एक तलाव निर्माण झाला आहे. या भागातील रस्ते नष्ट झाले असून, आधुनिक उपकरणाच्या सहाय्याने बचावकार्य सुरू आहे. आतापर्यंत अनेक पर्यटकांना वाचवण्यात यश आले असून, महाराष्ट्रातील पर्यटक सुखरूप परत आले आहेत.

उत्तराखंडमध्ये ५ ऑगस्ट रोजी अचानक आलेल्या ढगफुटीमुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले होते तर जागोजागी पर्यटक व चारधाम यात्रेकरू अडकून पडले. याचा सर्वाधिक फटका धराली गावाला बसला आहे. बचाव कार्यात सैन्यातर्फे भेदक रडारच्या सहाय्याने ढिगाऱ्याखाली दबलेल्यांचा शोध घेतला जात आहे. खीर नदीला आलेल्या पुरामुळे हे गावच जमीनदोस्त झाले होते. या गावातील दीडशे ते दोनशे लोक अद्याप ढिगाऱ्याखाली अडकले असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या गावात आता इंटरनेट व मोबाईल सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. धराली, उत्तरकाशी व हर्षिल या भागातील अनेक रस्ते अद्यापही बंदच आहेत. येथील वीजपुरवठाही बंद झाल्यामुळे उत्तरकाशीत महाकाय जनरेटर आणण्यात आला आहे. गंगणी गावाजवळील बेली ब्रिजचे काम सुरू झाले असून तो दोन दिवसात पूर्ण होईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.

## पाकिस्तानची ५ विमाने पाडली वायुदल प्रमुखांनी माहिती दिली

**युद्धात पाकिस्तानचे मोठे नुकसान**

■ बंगळुरू

**पहलगाम** येथील पर्यटकांवर दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने केलेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारताने पाकिस्तानची ५ लढाऊ विमाने व एक मोठे विमान पाडल्याची माहिती वायुदल प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी दिली.

बंगळुरुमध्ये भारताच्या हवाई हल्ल्याची माहिती देताना त्यांनी पाकिस्तानच्या मुरीदके व बहावलपूर येथील लष्कर मुख्यालयावर केलेल्या हल्ल्याच्या आधीची व नंतरची छायाचित्रे प्रसारमाध्यमांना दाखवून हल्ल्याची माहिती दिली. ते म्हणाले, भारताच्या वायू संरक्षण प्रणाली एक - ४०० च्या सहाय्याने पाकिस्तानची पाच लष्करी व एक मोठे विमान पाडले. या प्रणालीच्या माध्यमातून ३०० किलोमीटर अंतरावरून ही विमाने पाडण्यात आली. जमिनीवरून हवेत मारा करणारा हा सर्वात मोठा हल्ला होता. यामुळे पाकिस्तानच्या विमानांना दूर ठेवण्यात यश आले. पाकिस्तानला आमची ही प्रणाली भेदता आली नाही. पाकिस्तानच्या लष्करी तळावरील हल्ल्यानंतर इथे सारे काही उद्ध्वस्त झाल्याचे या छायाचित्रांमधून दिसत असून, त्यातील काही उपग्रहाद्वारे घेतलेली तर काही स्थानिक प्रसारमाध्यमांनी घेतलेली छायाचित्रे आहेत. यावेळी शाहबाज जैकबाबाद विमानतळावरही भारताने हल्ला केला. येथील एफ १६ विमानांचे अर्धे हँगर नष्ट करण्यात आले. मुरीदके व चकलाला येथील मुख्यालयावरही हल्ले करण्यात आले. जवळ जवळ ८० ते ९० तास चाललेल्या या युद्धात पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले.